cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–४७ | बुधवार दि.६ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘केंद्रीकरणाचा झंझावात आणि प्रादेशिक पुनर्रचनेची नवी राजकीय दिशा’

भारतीय लोकशाहीचे एक वैशिष्ट्य म्हणजे सत्तांतराची सातत्यपूर्ण प्रक्रिया. मतदारांचा कौल हा अंतिम आणि निर्णायक असतो, त्यामुळे कोणताही पक्ष कायमस्वरूपी सत्तेवर राहू शकत नाही हेच या व्यवस्थेचे सामर्थ्य आहे. मात्र, अलीकडील पाच राज्यांच्या निवडणूक निकालांनी या सत्तांतराच्या प्रक्रियेला एक नवा आयाम दिला आहे. या निकालांतून एकाच वेळी दोन परस्परविरोधी वाटणारे प्रवाह स्पष्ट दिसतात. एकीकडे राष्ट्रीय स्तरावर सत्तेचे केंद्रीकरण, तर दुसरीकडे राज्यनिहाय प्रादेशिक पुनर्रचना.

# शेतकऱ्यांना दिलासा : जूनच्या सुरुवातीलाच मान्सून धडकणार !

## हवामान खात्याचा अंदाज, मे–जूनमध्ये मोठा पाऊस पडण्याची शक्यता

पुणे । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. यावर्षी मान्सून वेळेत दाखल होण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. जून महिन्याच्या सुरुवातीलाच केरळमध्ये मान्सून धडकणार आहे. यामुळे शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. अल निनोचा प्रभाव यंदा जाणवत असला तरी पाऊस उशिरा येणार नाही, ही सकारात्मक बाब आहे. मात्र पावसाचा जोर काही प्रमाणात कमी राहू शकतो, असा अंदाजही व्यक्त करण्यात आला आहे.**



१४ ते २० मे दरम्यान अंदमान–निकोबार बेटांवर मान्सून सक्रिय होईल अशी माहिती देण्यात आली आहे. त्यानंतर तो केरळमध्ये प्रवेश करून संपूर्ण भारतभर पसरतो, या भागात जोरदार पावसाची शक्यता आहे. यावर्षी अल–निनो सक्रिय होण्याची चिंता सुद्धा आहे. आयएमडी नुसार दीर्घकालीन पूर्वअंदाजानुसार जून ते सप्टेंबर या महिन्यात नियमित पावसापेक्षा यंदा पर्जन्यमान कमी असेल. सध्या अल निनोची भीती असली तरी भारतावर त्याचा मोठा प्रभाव अद्याप दिसलेला नाही. जुलै महिन्यात अल निनो भारतात कहर दाखवण्याची भीती व्यक्त होत आहे. परिणामी जुलै महिन्यात मान्सूनला फटका बसू शकतो. हवामान खात्याने मे २०२६ साठी जो पूर्वअंदाज वर्तवला आहे, त्यात देशभरात काही भागात मुसळधार पाऊस पडेल. नेहमीच्या पावसापेक्षा हे प्रमाण ११०% जास्त असेल. ॲग्रोकेम फेडरेशन ऑफ इंडियाचे महासंचालक कल्याण गोस्वामी यांनी मे महिन्यात चांगला पाऊस झाल्याने जमीन भूसभूशीत होण्यास मदत होईल असे म्हटले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना ▶▶ पान २ वर

# मी निवडणूक हरलेली नाही, राजीनामा देणार नाही

## ममता बॅनर्जी पराभवानंतरही आक्रमक, राजीनामा देण्यास नकार

कोलकाता । वृत्तसंस्था

**२०२६ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये आपल्या पक्षाचा पराभव झाल्यानंतर, तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी राजीनामा देण्यास नकार दिला. ‘‘आम्ही निवडणूक हरलो नाही,‘‘ असा ठाम पवित्रा घेत त्यांनी निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर फेरफार, हिंसाचार आणि संस्थात्मक पक्षपाताचा आरोप केला. ‘‘माझ्या राजीनाम्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मी राजीनामा देणार नाही. आम्ही निवडणूक हरलो नाही,‘‘ असे बॅनर्जी म्हणाल्या. तसेच, आपल्या पक्षाने खरे तर ‘‘नैतिक विजय‘‘ मिळवला असल्याचेही त्यांनी नमूद केले.**



पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे. त्या म्हणाल्या, ‘‘विद्यार्थी राजकारणाच्या दिवसांपासून ते अगदी आजच्या काळापर्यंत, आपण अशी इतकी गलिच्छ आणि किळसवाणी निवडणूक कधीच पाहिली नव्हती. ही निवडणूक भाजपविरुद्धची लढत नव्हती, तर ती संपूर्ण सरकारी यंत्रणेविरुद्धची लढाई होती. विशेषतः, पंतप्रधान आणि गृहमंत्री यांच्या थेट हस्तक्षेपाविरुद्धची निवडणूक होती. ममता बॅनर्जी यांनी दावा केला की, एका कटकारस्थानाचा भाग म्हणून, मतदार यादीतून ९० लाख (९ दशलक्ष) नावे वगळण्यात आली होती. तृणमूल काँग्रेसने न्यायालयाचा दरवाजा ठोठावल्यानंतरच ३२ लाख (३.२ दशलक्ष) नावे पुन्हा समाविष्ट करण्यात आली; मात्र, हा फेरफार तिथेच थांबला नाही. त्यांनी असा आरोप केला की, त्यानंतर पुन्हा ७ लाख नावे गुपचूपपणे यादीत जोडण्यात आली. ही कृती सर्वांना अंधारात ठेवून पार पडली. ▶▶ पान २ वर

# राष्ट्रवादीचे नेते आडसकराकडून मुकादमाचे अपहरण

धारूर । प्रतिनिधी

सहकारी साखर कारखान्याची घेतलेली उचल त्याची परतफेड न केल्यामुळे आडस धारूर परिसरातून एका ऊसतोड मुकादमाचे अपहरण करण्यात आले होते याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती मात्र आता हे अपहरण राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते रमेश आडसकर यांच्या सांगण्यावरून केला असल्याचे समोर आले असून तसा व्हिडिओ देखील वायरल होत आहे.



पूर्वी भाजपमध्ये असलेले आणि नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश केलेले युवा नेते रमेश आडसकर यांच्याकडे अंबाजोगाई सहकारी साखर कारखाना आहे विशेषता एका ऊसतोड मुकादमाकडे साखर कारखान्याची मोठी उचल होती मात्र ती न दिली गेल्याने काल आडस धारूर या परिसरातून त्या मुकादमाचे अपहरण ▶▶ पान २ वर

# नसरापूर प्रकरणात फडणवीसांचा मोठा निर्णय; कायद्यात बदल करण्याचे निर्देश

पुणे । प्रतिनिधी

भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या चिमुकलीवरील अत्याचार आणि हत्येच्या घटनेनंतर राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठा निर्णय घेत लैंगिक गुन्ह्यांतील आरोपींना पॅरोल मिळू नये यासाठी कायद्यात बदल करण्याचे निर्देश दिले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीत या प्रकरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली असून, विधी व न्याय विभागाला आवश्यक ती कारवाई करण्यास सांगण्यात आले आहे.



शुक्रवारी (१ मे) उघडकीस आलेल्या या धक्कादायक घटनेत साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेनंतर संतप्त ग्रामस्थांनी पुणे–बंगळुरू महामार्ग रोखत तीव्र आंदोलन केले, तसेच बंद पाळून निषेध नोंदवला. या प्रकरणात आरोपी भीमराव कांबळे याला अटक करण्यात आली असून, न्यायालयाने त्याला ७ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. त्याच्यावर हत्या, बलात्कार आणि पोक्सो अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, आरोपीविरोधात यापूर्वीही विनयभंग आणि पोक्सोअंतर्गत गुन्ह्यांची नोंद असल्याचे समोर आले आहे. आरोपीने बालिकेची दगडाने ठेचून हत्या केल्यानंतर मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली ▶▶ पान २ वर

# मी मंत्र्याचा ओएसडी, माझं कोणी काहीही बिघडवू शकत नाही

## अतुल सावेंच्या स्वीय सहायकाची पत्नीला मारहाण अन् धमकी

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

भाजपचे नेते आणि मंत्री अतुल सावे यांचे विशेष कर्तव्य अधिकारी यांच्या विरोधात पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय धुलचंद कारंडे असं सावेंच्या ओसडींचं नाव आहे, त्यांच्यावर पत्नीचा खून करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी पुण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत कारंडे यांनी आपल्या लहान मुलालाही बॅटने बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे. पुण्यातील कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३० एप्रिल रोजी नवीन गार्डन या त्यांच्या निवासस्थानी ही घटना घडली असल्याचं समोर आलं आहे. तर अतुल सावे यांच्या ओएसडीच्या पीडित पत्नी यांनी एबीपी माझाशी बोलताना त्यांच्यासोबत घडलेली आपबिती सांगितली.

मंत्री अतुल सावे यांच्या ओएसडीच्या घरीच कौटुंबिक हिंसाचार झाल्याचं समोर आलं आहे. मी मंत्र्याचा ओएसडी माझा कोणी काहीही बिघडवू शकत नाही म्हणत पत्नीला धमकी दिली. त्याचबरोबर पत्नीला ▶▶ पान २ वर

# राज्यात मेगा शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा

पुणे । प्रतिनिधी

राज्यातील हजारो भावी शिक्षकांसाठी आनंदाची बातमी आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून प्रतिक्षेत असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेला आता वेग आला आहे. त्यामुळे शिक्षण विभागाने ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रिक्त पदांच्या जाहिराती पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध करण्याचे आदेश दिले आहेत. या भरतीमुळे जिल्हा परिषद, नगरपालिका आणि खासगी अनुदानित शाळांमधील शिक्षकांचा प्रश्न सुटण्यास



मदत होणार आहे.


शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार, केवळ सध्याचीच रिक्त पदे नव्हे, तर मे २०२६ पर्यंत सेवानिवृत्त होणाऱ्या ▶▶ पान २ वर

# आठ लग्ने पचली मात्र नवव्या लग्नात फुटले बिंग!

## बोगस नवरीसह एजंटावर बीड जिल्ह्यात गुन्हा दाखल

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात लग्नाच्या नावाखाली तरुणांची फसवणूक करणाऱ्या एका मोठ्या आंतरजिल्हा टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या टोळीतील नवरीने आतापर्यंत चक्क आठवेळा लग्न करून विविध नवरदेवांना लाखो रुपयांचा गंडा घातला होता. नवव्या



लग्नाच्या तयारीत असतानाच या ‘बोगस नवरी’चे बिंग फुटले आणि पोलिसांनी तिला बेड्या ठोकल्या.

उमापूर येथील योगेश शिंदे या युवकाला लग्नासाठी मुलगी दाखवून एजंटमार्फत व्यवहार ठरवण्यात आला होता. लग्न लावून देण्यासाठी तरुणाकडून मोठी रक्कम उकळण्यात आली. ▶▶ पान २ वर

# आता महिला शेतकरीही सक्षम व आत्मनिर्भर बनतील-ज्योतीताई मेटे

## बीड येथील कृषी प्रदर्शनात किसान कृषिरत्न पुरस्कार सोहळा

बीड । प्रतिनिधी

बीड येथे सुरू असलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात प्रगतशील शेतकऱ्यांचा किसान कृषिरत्न पुरस्कार सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. आधुनिक तंत्रज्ञान, शेतीतील नवनवीन प्रयोग आणि उत्पादनवाढीच्या विविध पद्धतींचा परिचय करून देणाऱ्या या प्रदर्शनाला शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर प्रगतशील



शेतकऱ्यांना ‘‘ किसान कृषिरत्न पुरस्कार २०२६ ’’ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना ज्योती मेटे म्हणाल्या की, कृषी प्रदर्शन हे केवळ तंत्रज्ञान पाहण्याचे व्यासपीठ नसून, शेतकऱ्यांच्या प्रगतीचा मार्गदर्शक ठरते. विशेषतः महिला शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन अत्यंत उपयुक्त आहे. नवीन तंत्रज्ञान, आधुनिक शेती पद्धती, प्रक्रिया उद्योग आणि बाजारपेठेची माहिती मिळाल्यामुळे महिला शेतकरी आता सक्षम व आत्मनिर्भर बनतील. त्या शेतीसोबतच पूरक व्यवसायातही पुढे येतील, ही काळाची गरज आहे. त्या पुढे म्हणाल्या की, ग्रामीण भागातील महिलांनी शेतीत मोठे योगदान दिले आहे. मात्र त्यांना योग्य मार्गदर्शन, तांत्रिक माहिती आणि संधी मिळाल्यास त्या शेतीला नवसंजीवनी ▶▶ पान २ वर

# लाडकी बहीण योजना लटकण्याच्या मार्गावर

मुंबई । प्रतिनिधी

राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेच्या महिला लाभार्थींचे मार्च आणि एप्रिल महिन्याचे हप्ते अद्याप वितरित केलेले नाहीत. ई–केवायसी प्रक्रियेची अंतिम मुदत ३० एप्रिल रोजी संपली असली, तरी चुकीच्या वर्गीकरणामुळे काही प्रकरणांची पडताळणी अद्याप सुरूच आहे.

ई–केवायसी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लाभार्थी खात्यांची



अंतिम संख्या सुमारे १.८० कोटींवर स्थिरावण्याची शक्यता आहे. या योजनेचा लाभ पुरुष सदस्य आणि काही सरकारी कर्मचारी घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ही पडताळणी मोहीम हाती घेण्यात आली होती. ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### चंदिगढ विमानतळावर लँडिंगदरम्यान स्फोट

चंदिगढः गोवा आणि हैदराबादमार्गे चंदिगढला येणाऱ्या इंडिगोच्या विमानात लँडिंगच्या वेळी मोबाइल पॉवर बँकचा भीषण स्फोट झाल्याची धक्कादायक घटना मंगळवारी (दि. ३) घडली. मोहाली येथील शहीद भगतसिंग आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान उतरत असतानाच ही दुर्घटना घडली असून, यामध्ये पाच प्रवासी जखमी झाले आहेत. या घटनेमुळे विमानात काही काळ प्रचंड गोंधळ आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, इंडिगोचे विमान दुपारी ३ वाजून ३२ मिनिटांनी धावपट्टीवर उतरले. विमान थांबण्याच्या काही मिनिटे आधी, म्हणजेच ३ वाजून ३५ मिनिटांच्या सुमारास ३९–एफ या सीटवर बसलेल्या देवांश नावाच्या प्रवाशाच्या पॉवर बँकने अचानक पेट घेतला. प्रवाशाने तत्काळ याची कल्पना केबिन क्रू सदस्यांना दिली, मात्र अवघ्या काही सेकंदातच पॉवर बँकचा जोरदार स्फोट झाला. या स्फोटामुळे केबिनमध्ये धूर पसरला आणि आग लागली.

### ४ पोलीस कर्मचाऱ्यांसह ५ जणांचा दुर्दैवी अंत

लखनौ : उत्तर प्रदेशात एक भीषण अपघात घडला असून, पोलिसांच्या पथकातील चार कर्मचाऱ्यांसह एकूण पाच जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे पोलिस दलात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जालौन येथून हरियाणातील नूंहमध्ये अपहरण प्रकरणात कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांच्या पथकाचा परतीच्या प्रवासात अपघात झाला. या अपघातात पोलीस उपनिरीक्षक मोहित यादव, सत्यभान यांच्यासह दोन शिपाई आणि एका तक्रारदाराचा मृत्यू झाला. प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, वाहन वेगात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने कार अनियंत्रित झाली आणि भीषण अपघात झाला. धडकेनंतर कारचा अक्षरशः चेंदामेंदा झाला असून, त्यातील सर्वांचा जागीच मृत्यू झाला.

### हायकोर्टाने उच्चशिक्षित पत्नीला पोटगी नाकारली

अलाहाबादः पोटगी हे जोडीदाराला काम करण्यापासून परावृत्त करण्याचे साधन नाही, कमावण्यास पूर्णपणे सक्षम असलेला जोडीदार काम न करण्याचा पर्याय निवडून आपल्या जोडीदारावर आर्थिक भार टाकू शकत नाही, असे वैवाहिक कायद्यातील एका महत्त्वाच्या तत्त्वाचा पुनरुच्चार करत अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अतुल श्रीधरन आणि न्यायमूर्ती विवेक सरन यांच्या खंडपीठाने डॉक्टर पत्नीचा अंतरिम पोटगीचा दावा फेटाळला. हे प्रकरण दोन उच्चशिक्षित वैद्यकीय व्यावसायिकांमधील वैवाहिक वादातून निर्माण झाले होते. एम.डी. पदवीधारक आणि स्त्रीरोगतज्ज्ञ असलेल्या पत्नीने कनिष्ठ न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान दिले होते. कनिष्ठ न्यायालयाने हिंदू विवाह कायदा, १९५५ च्या कलम २४ आणि २६ अंतर्गत तिचा पोटगीचा अर्ज अंशतः फेटाळला होता. कनिष्ठ न्यायालयाने तीन मुलांच्या संगोपनासाठी न्यूरोसर्जन असलेल्या पतीला दरमहा ६०,००० रुपये देण्याचे निर्देश दिले होते, मात्र कलम २४ अंतर्गत पत्नीला स्वतःसाठी पोटगी देण्यास नकार दिला होता. या निर्णयाविरोधात पत्नीने उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०५ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १२०.५० क्विंटल | २,०२१ | २,६०० | २,३१५ |
| ज्वारी/हायब्रिड : ८६.५० क्विंटल | १,६०० | ३,७०० | २,०७९ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ५.०० क्विंटल | ६,००० | ६,५०१ | ६,२५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: १३३.५० क्विंटल | १,८५० | २,६३१ | २,२४५ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ३६.०० क्विंटल | ४,७७६ | ५,१५० | ५,०१९ |

## अग्रलेख

# ‘केंद्रीकरणाचा झंझावात आणि प्रादेशिक पुनर्रचनेची नवी राजकीय दिशा’

भारतीय लोकशाहीचे एक वैशिष्ट्य म्हणजे सत्तांतराची सातत्यपूर्ण प्रक्रिया. मतदारांचा कौल हा अंतिम आणि निर्णायक असतो, त्यामुळे कोणताही पक्ष कायमस्वरूपी सत्तेवर राहू शकत नाही हेच या व्यवस्थेचे सामर्थ्य आहे. मात्र, अलीकडील पाच राज्यांच्या निवडणूक निकालांनी या सत्तांतराच्या प्रक्रियेला एक नवा आयाम दिला आहे. या निकालांतून एकाच वेळी दोन परस्परविरोधी वाटणारे प्रवाह स्पष्ट दिसतात. एकीकडे राष्ट्रीय स्तरावर सत्तेचे केंद्रीकरण, तर दुसरीकडे राज्यनिहाय प्रादेशिक पुनर्रचना.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी ने पुन्हा एकदा आपल्या संघटनशक्तीचा आणि निवडणूक रणनीतीचा प्रभाव दाखवून दिला आहे. बिहारपासून पश्चिम बंगालपर्यंत, आणि आसामपासून देशाच्या इतर भागांपर्यंत भाजपने उभारलेले ‘भगवे वादळ’ हे केवळ निवडणूक विजयाचे प्रतीक नाही, तर भारतीय राजकारणाच्या बदलत्या स्वरूपाचे संकेत आहे. एकेकाळी देशभर प्रभाव असलेला इंडियन नॅशनल काँग्रेस आज त्या जागेवरून मोठ्या प्रमाणात मागे पडताना दिसतो, आणि ती जागा भाजपने व्यापल्याचे स्पष्ट झाले आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील प्रादेशिक राजकारण अजूनही प्रभावी असले, तरी त्याला आता ठोस आव्हान निर्माण झाले आहे. भाजपने येथे मिळवलेली वाढ ही केवळ जागांची नाही, तर विचारसरणीच्या पातळीवर केलेला हस्तक्षेप आहे. डाव्या पक्षांच्या पतनानंतर तृणमूल काँग्रेसने निर्माण केलेले वर्चस्व आता ढासळण्याच्या उंबरठ्यावर आहे. ममता बॅनर्जी यांचे राजकारण संपुष्टात येईल असे म्हणणे घाईचे ठरेल; मात्र त्यांची ‘अपरिहार्यता’ निश्चितच कमी झाली आहे. आसाम आणि ईशान्य भारतात भाजपने प्रादेशिक प्रश्नांना हाताळत स्वतःला ‘राष्ट्रीय पर्याय’ म्हणून उभे केले आहे. नागरिकत्व, सीमावाद आणि स्थानिक अस्मिता या संवेदनशील मुद्द्यांवर सातत्याने भूमिका घेत भाजपने येथे आपले स्थान बळकट केले आहे. हा विस्तार केवळ निवडणुकीपुरता मर्यादित नसून दीर्घकालीन राजकीय गुंतवणुकीचा परिणाम आहे. दुसरीकडे, केरळमध्ये राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसला नव्याने संजीवनी मिळताना दिसते. डाव्या विचारसरणीचा प्रभाव अजूनही ठळक असला, तरी ‘बदल हवा’ या मतदारांच्या मानसिकतेने काँग्रेससाठी संधी निर्माण केली आहे. येथे सत्तांतर हे केवळ राजकीय बदल नसून विचारांच्या नव्या संघर्षाची सुरुवात आहे. तामिळनाडूमध्ये घडणाऱ्या बदलांनी राजकीय समीकरणांना नवे वळण दिले आहे. द्रविडी राजकारणाच्या पारंपरिक चौकटीत आता तडे जाताना दिसतात. अभिनेता विजय यांच्याकडे झुकणारा जनतेचा कल हा वारसाहक्कावर आधारित राजकारणाविरोधातील प्रतिक्रिया म्हणून पाहता येतो. ही प्रवृत्ती थेट भाजपच्या फायद्याची नसली, तरी प्रादेशिक राजकारणात अस्थिरता निर्माण करून नव्या शक्यता उघडणारी आहे. इतिहासाकडे पाहिले, तर अटल बिहारी वाजपायी यांनी ममता बॅनर्जींसारख्या प्रादेशिक नेत्यांना साथ देत ज्या शक्यता निर्माण केल्या, त्या आज भाजपसाठी सत्तेच्या महामार्गात परिवर्तित झाल्या आहेत. या प्रक्रियेत प्रादेशिक आणि राष्ट्रीय राजकारण यांचे एक वेगळे समीकरण तयार झाले आहे. पुदुचेरीसारख्या छोट्या केंद्रशासित प्रदेशात राजकारण अधिक सूक्ष्म आणि गुंतागुंतीचे आहे. येथे स्थानिक नेतृत्व, आघाड्या आणि केंद्राशी असलेले संबंध हे निर्णायक ठरतात. त्यामुळे हा प्रदेश ‘राजकीय प्रयोगशाळा’ म्हणून ओळखला जातो. विरोधकांच्या बाबतीत मात्र एकसंधतेचा अभाव ठळकपणे जाणवतो. राहुल गांधी यांची व्यापक आघाडीची भूमिका आणि पी.चिदंबरम यांसारख्या नेत्यांचा सावध दृष्टिकोन यामध्ये काँग्रेस अडकलेली दिसते. भाजपविरोधी मतांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न असला, तरी स्पष्ट रणनीतीचा अभाव हा मोठा अडथळा आहे. भाजपच्या विजयामागे संघटनशक्ती, संसाधनांचा प्रभावी वापर आणि सत्तेचा लाभ या तिन्हींचा संगम दिसतो. विरोधकांकडून यंत्रणांच्या गैरवापराचे आरोप केले जात असले, तरी केवळ त्या आधारे या यशाचे स्पष्टीकरण देता येत नाही. निवडणूक यंत्रणा, नेतृत्व आणि कार्यकर्त्यांचे जाळे या सर्वांचा एकत्रित परिणाम या विजयामागे आहे. एकूणच, भारतीय राजकारण एका नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. राष्ट्रीय पक्षाचे वर्चस्व वाढत असले, तरी प्रादेशिक अस्मिता, स्थानिक नेतृत्व आणि मतदारांची बदलाची मानसिकता हे घटक अजूनही तितकेच प्रभावी आहेत. भविष्यात जो पक्ष या तिन्ही घटकांचा योग्य समतोल साधेल, तोच देशाच्या राजकारणाचा केंद्रबिंदू बनेल. भारतीय लोकशाहीची खरी कसोटी आता याच संतुलनात आहे.

## घाटनांदुर येथे कुलरचा शॉक लागून युवकाचा मृत्यू



**घाटनांदुर । प्रतिनिधी**

येथील नसीर खदिर सय्यद वय २५ या युवकांने या तीव्र उष्णतेमुळे घरातील कुलर मध्ये पाणी भरत असताना विजेचा शॉक बसल्याने या युवकाचा मृत्यू झाल्याची ही घटना मंगळवार रोजी सकाळच्या सुमारास घडल्यानंतर अंबाजोगाई येथील ग्रामीण शासकीय रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले नसीर सय्यद हा बांधकाम काम करत असे त्याच्या या जाण्याने सय्यद कुटुंबातील करता मुलगा मृत झाल्याने घाटनांदुर व परिसरातून नागरिकांतून हळ हळ व्यक्त केली जात आहे नजीर च्या पश्चात पत्नी, आठ महिन्याची मुलगी ,आई, वडील असा परिवार आहे.

## अल्पवयीन मलीची छेडछाड व विनयभंग प्रकरणी आरोपीस ५ वर्षाची शिक्षा

**बीड । प्रतिनिधी**

**अल्पवयीन मुलीचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी इस्लामप्रा बीड येथील रहिवाशी असलेला आरोपी नामे, शेख युनुस शेख लाल यास मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब मा. स्रेश एस. घोरपडे साहेब यांनी दोषी ठरन ४ वर्ष सश्रम करावास व१०,०००/ रूपये दंड व दंडन भरल्यास १ वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल अड. अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले.**

या प्रकणी थोडक्यात हकिगत अशी की. दिनांक १९/०३/२०२३ रोजी सकाळी ०७ ०० वाजता मुलगी ही गल्लीतील शेख यन्स याचे चहा पाण्याचे हॉटेल वर असता ती आर्ध्या तासाने घरी परत आली तीला मी उशिर का झाला असे विचारले असतातीरड़ लागली म्हणून तीला विचारले असता तिने सांगितले की, मी दध आणन्यासाठी यन्स चाचा यांचे चहाचे हॉटेल समोर उभी असतांना मी दुध घेतले तेव्हा मला युनुस चाचाने हॉटेलमध्ये बोलावले मी हॉटिलजवळ गेल असता यनुसचाचाने मला हॉटेलमध्ये बोलावले मी आतमध्ये जाण्यास नकार दिला असता त्यांनी माडा हाताना धरून हॉटेलमध्ये ओढले व माझे गळयास मिठी मारली मी त्यास मला सोड असे म्हणाले असता त्याने मला हॉटेलच्या आतील बाजस ओढण्याचा प्रयत्न करू लागला व त्याने त्याचे पॅन्टची चैन खोलली तेव्हा मी मोठयाने ओरड लागले तेव्हा सयद शहानवाज इकबाल हे तेथे आले व त्यांनी यन्स यास त क्या कर रहा है तेरे बच्चीकी उमरकी है असे म्हणन त्यास शिवीगाळ करून दोन चापटा मारल्या व मला त घरी जा असे म्हणाले, तेव्हा मी घरी आले पिडीतेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन पेठ बीड येथे आरोपी विरूध्द कलम ३५%-अ भादवी आणि कलम ८, १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ प्रमाणे ग्न्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तात्कालील सपोनि जी.एल .अंतरप यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे आरोपी विरूच्द



दोपारोपपत्र दाखल केले सदर प्रकरणी सुनावणी मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब मा. सुरेश एस.घोरपडे साहेब बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकण ०६ साक्षीदार तपासण्यात आले. सदर प्रकरणातील फिर्यादीव प्रत्यक्षदर्शी साक्षीदार फितूर झाले असतांना सदर प्रकरणात केवळ पिडीता. वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी. व इतर साक्षीदार यांचा प्रावा व सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून मा. तदर्थ जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब मा. सरेश एस.घोरपडे साहेब यांनी आरोपी यास कलम ३५-अभादवी आणि कलम ८. १२ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध्द कायदा सन २०१२ अन्वये यांनी दोषी ठखून ५ वर्ष सश्रम करावास व१०,००० / रूपये दंड व दंड न भरल्यास १ वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले. तपास अधिकारी सपोनि जी.एल.अंतरप’ व पैरवी अधिकारी श्री.. ऋषीकेश सानपकोर्ट डयूटी बाळासाहेब सानप यांनी सहकार्य केले.

## जालन्यात अल्पवयीन मुलांच्या नावावर चंदा वसुली प्रकरण; बाल हक्क आयोगाची सुयो-मोटो दखल

### नेपाळ, बिहार व बंगालमधील १३ मुलांची सुटका; शिक्षकावर कारवाईचे आदेश

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहरात अल्पवयीन मुलांच्या नावावर चंदा वसुली करून आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या गंभीर आरोपांनी खळबळ उडाली असून या प्रकरणाची दखल महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने सुयो-मोटो पद्धतीने घेतली आहे. संबंधित प्रकरणात नेपाळ, बिहार आणि पश्चिम बंगाल येथील एकूण १३ अल्पवयीन मुलांची सुटका करण्यात आल्याची माहिती समोर आली असून, या मुलांच्या हक्कांचे उल्लंघन, संभाव्य मानवी तस्करी आणि शोषणाच्या पार्श्वभूमीवर आयोगाने तातडीने कारवाईचे आदेश दिले आहेत. दि. ४ मे २०२६ रोजी आयोगाच्या वतीने जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी तसेच बाल कल्याण समिती अध्यक्ष यांना पत्र पाठवून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणाबाबत एका वृत्तवाहिनीवर प्रसिद्ध झालेल्या बातमीच्या आधारे आयोगाने स्वतःहून दखल घेतली आहे.**

प्राथमिक माहितीनुसार, जालन्यातील एका मदरसा शिक्षकावर अल्पवयीन मुलांच्या नावावर विविध ठिकाणी चंदा वसुल करून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. अब्दुल रऊफ अन्सारी असे संबंधित शिक्षकाचे नाव असल्याचे समोर आले असून, या संदर्भात मौलाना सय्यद जमिल जानिमिया यांनी पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीनंतर सदर बाजार पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला आहे. या तपासादरम्यान पोलिसांनी एकूण १३ अल्पवयीन मुलांची सुटका केली असून सध्या त्यांना बाल निरीक्षणगृहात ठेवण्यात आले आहे. सुटका करण्यात आलेल्या मुलांमध्ये नेपाळमधील सहा मुलांचा समावेश असल्याचे समजते. उर्वरित मुले बिहार आणि पश्चिम बंगाल येथील असल्याची माहिती समोर आली आहे. या मुलांच्या पालकांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न पोलीस प्रशासनाकडून सुरू आहेत. सदर प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे लक्षात घेऊन बाल हक्क आयोगाने सहा महत्त्वपूर्ण निर्देश जारी केले आहेत. त्यानुसार, जिल्हा प्रशासनाने तात्काळ प्राथमिक कार्यवाही अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच संबंधित आरोपीविरुद्ध लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी, असे स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे. याशिवाय सुटका करण्यात आलेल्या सर्व मुलांचे वैद्यकीय परीक्षण, समुपदेशन आणि पुनर्वसनाची योग्य व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मुलांच्या मूळ राज्यांशी समन्वय साधून त्यांची सुरक्षित पुनर्वापसी सुनिश्चित करणेही प्रशासनाची जबाबदारी असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. या प्रकरणात बाल तस्करी, बालकामगार, लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा तसेच बाल न्याय अंतर्गत कोणती कारवाई करण्यात आली आहे, याचा सविस्तर तपशील सादर करण्यास सांगण्यात आले आहे. तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी कोणत्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत, याची माहितीही आयोगाने मागवली आहे. तपासादरम्यान आणखी एक धक्कादायक बाब समोर आली असून, शहरातील विविध भागात चंदा वसुलीसाठी पेट्या ठेवण्यात आल्याचा आरोप आहे. या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी गोळा करण्यात आला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. संबंधित ट्रस्ट नोंदणीकृत आहे का, चंदा वसुलीसाठी आवश्यक परवानगी घेण्यात आली होती का, आणि गोळा झालेल्या निधीचा वापर नेमका कशासाठी करण्यात आला, याचाही तपास पोलिसांकडून सुरू आहे. सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणाची चौकशी सखोलपणे सुरू असून सर्व पैलूंवर बारकाईने तपास केला जात आहे. चौकशी पूर्ण झाल्यानंतर दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. या प्रकरणातील तपासातून नेमके कोणते धागेदोरे समोर येतात आणि दोषींवर कितपत कठोर कारवाई होते, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## शिक्षक-विद्यार्थी हितासाठी गतिमान प्रशासनाचा संकल्प

### उपशिक्षणाधिकारी शिंदे यांचा अमरसिंह पंडित यांचेकडून सन्मान

**बीड प्रतिनिधी**

**धनंजय रामराव शिंदे यांनी उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) म्हणून दि. ४ मे रोजी कार्यभार स्वीकारला. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कार्यालयात तब्बल १४ वर्षे कार्य करताना मिळालेल्या अनुभवाच्या बळावर ते प्रशासन अधिक परिणामकारक करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.**



उपशिक्षणाधिकारी या पदाची नवीन जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी म्हटले की, शिक्षणाधिकारी (मा.) सौ. प्रियाराणी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कामकाज पारदर्शक, गतिमान व परिणामकारक पद्धतीने राबविण्यात येईल. मुख्याध्यापक व शिक्षकांच्या समस्या तातडीने सोडवण्यासाठी विशेष लक्ष देण्यात येईल. अनुदानित, अंशतः अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक व मुख्याध्यापकांचे विविध प्रश्न प्राधान्याने सोडवून आवश्यक त्या उपाययोजना तत्काळ राबविण्यात येतील, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. तसेच, सेवानिवृत्त शिक्षकांची वैद्यकीय बिले वेळेत मंजूर करून त्यांचा जलद निपटारा करण्यात येईल. कार्यालयीन कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी ‘‘झिरो पेंडन्सी’’ धोरण राबवून सर्व प्रकरणांचा वेळेत निपटारा करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. दरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी उपशिक्षणाधियंती शिंदे यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. धनंजय शिंदे यांच्या नियुक्तीमुळे शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढविण्याच्या दिशेने हे पाऊल महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## शिवप्रसाद दायमा यांचे अल्पश: आजाराने निधन



**मंठा । प्रतिनिधी**

सेलू येथील प्रतिष्ठित व्यापारी शिवप्रसाद दायमा यांचे अल्पशः आजाराने शुक्रवार (ता. १) रोजी निधन झाले, मृत्यू समयी त्यांचे वय ७५ वर्षे होते. कोळसा व मेणबत्तीचे ते व्यापारी होते तसेच धार्मिक व मनमिळाऊ स्वभावाचे होते. त्यांच्या पश्चात दोन मूले, दोन मुली, तीन भाऊ, दोन बहिणी असा मोठा परिवार आहे.

## गणपती नेत्रालय जवळ तरूणाची आत्महत्या

**जालना । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील प्रसिद्ध असल्याले जालन्यातील गणपती नेत्रालय जवळ झाडाला लटकलेल्या अवस्थेत २५ ते ३० वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आला असून त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ही घटना जालना शहरातील गणपती नेत्रालय जवळ घटना घटना घडली आहे. गणपती नेत्रालय परिसरात रस्त्याच्या साइडला असलेल्या लिंबाच्या झाडाला लटकलेल्या अवस्थेत या तरुणाचा मृतदेह रात्रीच्या सुमारास आढळून आला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला आहे. दरम्यान, या तरुणाची ओळख अद्याप पटलेली नाही पोलिसांनी नागरिकाच्या मदतीने झाडावरून मृतदे खाली काढून पंचनामा केला तसेच मृतदे तपासणीसाठी जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवण्यात आला असून हा आत्महत्येचा प्रकार आहे की घातपात, याचा तपास पोलीस करीत आहेत.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांना दिलासा : जूनच्या

पेरणी करण्यास उपयुक्त वातावरण तयार होईल. तरीही शेतकऱ्यांनी जून महिन्यातील पावसाचा अंदाज घ्यावा आणि दुबार पेरणीचे संकट ओढावणार नाही यासाठी माहिती घ्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. या अंदाजामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. कारण अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाण्याची टंचाई निर्माण होत आहे. त्यामुळे सध्या पावसाची गरज आहे. शेतकऱ्यांच्या पिकांसाठी देखील पाण्याची गरज भासू लागली आहे.

-------

### राष्ट्रवादीचे नेते आडसकराकडून

करण्यात आले याप्रकरणी संबंधित मुकादमाच्या पत्नीने पोलीस ठाण्यामध्ये रीतसर तक्रार दिली असून या तक्रारीमध्ये रमेश आडसकर यांच्या काही कार्यकर्त्यांनी माझ्या नवऱ्याला जबरदस्तीने आडसकर साहेबांनी बोलावले आहे म्हणून घेऊन गेले गेले दोन दिवस तो परत न आल्यामुळे गुन्हा दाखल करण्यात आला मात्र आज एक व्हिडिओ व्हायरल झाला यामध्ये स्वतः रमेश आडसकर बोलत आहेत त्याच्याकडे लाखो रुपयांची थकबाकी आहे ती भरा म्हणून सांगत आहेत शिवाय तो आडस येथील माझ्या घरी असल्याचेही रमेश आडसकर या व्हिडिओमध्ये बोलताना फोनवर दिसत आहेत त्यामुळे या अपहरणामागे रमेश आडसकर यांचाच हात असल्याचे स्पष्ट होत आहे प्रामुख्याने या प्रकरणाला आणखी काही वेगळे वळण लागते की काय हे पाहणे गरजेचे आहे

------------

### मी निवडणूक हरलेली नाही,

२००४ मध्ये जेव्हा त्या पूर्णपणे एकाकी पडल्या होत्या, तेव्हाही त्यांनी अशा प्रकारची निवडणूक लुटमार आणि अत्याचार कधीच पाहिले नव्हते, असा दावाही त्यांनी केला. ‘‘आम्ही ही निवडणूक हरलो नाही; उलट, भाजपने निवडणूक आयोगावर दबाव टाकून, जनतेचा कौल (जनादेश) पळवून नेला आहे.‘‘ एक मोठा खुलासा करताना त्यांनी दावा केला कीमतदार यादीतील सुधारणांच्या नावाखालीत्यांच्या समर्थकांची लाखो मते हेतुपुरस्सर वगळण्यात आली आणि मतमोजणीच्या प्रक्रियेदरम्यान त्यांच्या प्रतिनिधींना (एजंट्सना) धमक्या देऊन दहशत निर्माण करण्यात आली. ममता यांनी हे स्पष्ट केले की, संपूर्ण आघाडी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे आणि भाजपच्या या ‘‘मतांच्या लुटमारी‘‘ विरोधात त्या गप्प बसणार नाहीत; त्याऐवजी, या निवडणुकीतील गैरप्रकारांना न्यायालयात आव्हान देण्याचा आणि एक निर्णायक, करो वा मरोची लढाई लढणार असल्याचा निर्धारही त्यंनी व्यक्त केला.

------------

### मी मंत्र्याचा ओएसडी, माझं

बेदम मारहाण केली. पत्नीच्या हातापायावर काळे निळे डाग पडले होते. मंत्री अतुल सावे यांचे ओएसडी विजय कारंडे यांनी स्वतःच्याच पत्नीला बेदम मारहाण केली आणि त्यानंतर मुलाला देखील मारहाण केल्याचं समोर आलं आहे. त्यांच्या पत्नीने मोबाईलचा पासवर्ड मागितला याचा त्यांना राग आला आणि त्यानंतर त्यांनी मारहाण करायला सुरुवात केली. तीन वर्षांपासून अतुल सावे यांच्याकडे ते ओएसडी म्हणून काम करतात अशी माहिती समोर आली आहे. पत्नीला सोबत मुंबईत घेऊन गेले नाही. मुलांनाही पुण्यातच ठेवलेलं. त्यामुळे पत्नीला संशयाला आणि त्यांनी मोबाईलच्या पासवर्ड बाबत विचारणा केली होती. याचाच राग मनात धरून मारहाण केली आहे. सोबतच मी मंत्र्याचा ओएसडी आहे, माझं कोणी काहीही बिघडवू शकत नाही असं म्हणत पत्नीला आणि त्यांच्या कुटुंबीयांना धमकी देखील दिली. हा सगळा त्रास झाल्यानंतर पत्नीने थेट पोलीस स्टेशन गाठलं आणि विजय कारंडे यांच्या विरोधात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरून पोलिसांनी विजय कारंडे यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. सध्या विजय कारंडे यांचा पोलीस शोध घेत आहे. पत्नीच्या वडिलांना देखील धमक्या देऊन त्यांच्याकडून २५ लाख रुपयांची मागणी केल्याचे देखील पत्नीच्या वडिलांनी सांगितलं आहे.

------------

### नसरापूर प्रकरणात फडणवीसांचा मोठा

लपवून ठेवला होता. या अमानुष घटनेमुळे सर्वत्र तीव्र संताप व्यक्त होत असून आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे. दरम्यान, तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले असून साक्षीदारांचे जबाब नोंदवण्याचे काम सुरू आहे. राज्यातील विविध ठिकाणी या घटनेच्या निषेधार्थ मोर्चे काढले जात आहेत. या पार्श्वभूमीवर, गंभीर गुन्ह्यांतील आरोपींना पॅरोल देण्याच्या प्रक्रियेत कठोर बदल करण्याची गरज असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

-------------

### आठ लग्ने पचली मात्र नवव्या

मात्र, लग्नानंतर काही दिवसांतच या नवरीच्या हालचालींबाबत संशय आल्याने पीडित तरुणाने चौकशी केली. तपासात या तरुणीने यापूर्वी आठ जणांशी विवाह करून त्यांना लुटल्याची धक्कादायक माहिती समोर आली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच योगेश शिंदे यांनी थेट पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन तक्रार दिली. ही टोळी प्रामुख्याने ग्रामीण भागातील उपवर तरुणांना आपले सावज बनवत असे. लग्नासाठी इच्छुक असलेल्या पण काही कारणास्तव लग्न जमण्यास अडचण येणाऱ्या तरुणांना एजंट शोधायचे. मुलगी पसंत पडल्यानंतर लग्नाचा खर्च आणि एजंटचे कमिशन या नावाखाली २ ते ३ लाख रुपये घेतले जात. लग्न झाल्यानंतर काही दिवस सासरी राहून दागिने आणि पैसे घेऊन नवरी पसार व्हायची किंवा किरकोळ कारणावरून वाद घालून माहेरी निघून जात असे. बीडमधील या ताज्या घटनेमुळे अशा टोळ्यांचे जाळे राज्यभर पसरल्याचे स्पष्ट झाले असून, पोलीस आता त्या दिशेने तपास करत आहेत. दरम्यान, पीडित योगेश शिंदे यांच्या तक्रारीनंतर चकलांबा पोलिसांनी नवरीसह संबंधित एजंटाला अटक केली आहे. या टोळीमध्ये आणखी कोणाचे हात गुंतले आहेत का, तसेच इतर किती तरुणांची फसवणूक झाली आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत. या कारवाईमुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून फसवणूक झालेल्या इतर तरुणांनीही पुढे येण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

----------

### राज्यात मेगा शिक्षक भरतीचा

शिक्षकांमुळे रिक्त होणारी संभाव्य पदे देखील या भरती प्रक्रियेत समाविष्ट केली जाणार आहेत. यामुळे पदसंख्या वाढली जाणार आहे. तसेच जास्तीत जास्त उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांसह खासगी शैक्षणिक संस्थांना त्यांच्याकडील रिक्त पदांची नोंदणी पवित्र पोर्टलवर करण्यासाठी १ ते ३१ मे हा कालावधी निश्चित करून देण्यात आला आहे. गेल्या वर्षी पार पडलेल्या ‘शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी’ परीक्षेसाठी सुमारे २ लाख २८ हजार उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २ लाख ११ हजार ३०८ उमेदवारांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. यातील ज्या १ लाख ७० हजार १०८ उमेदवारांनी आपली ‘स्व-प्रमाणपत्रे’ पूर्ण केली आहेत. त्यांना या भरती प्रक्रियेत प्राधान्याने सहभागी करून घेतले जाणार आहे. ही संपूर्ण भरती ‘पवित्र’ पोर्टलद्वारे ऑनलाईन पद्धतीने राबविली जाणार आहे. त्यामुळे वशिलेबाजीला चाप बसणार आहे. तसेच सर्व शाळा व्यवस्थापनांना त्यांच्याकडील आरक्षणानुसार बिंदुनामावली तपासूनच जाहिरात देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. जाहिराती प्रसिद्ध झाल्यानंतर जून महिन्यात उमेदवारांना त्यांच्या पात्रतेनुसार शाळांचे पसंतीक्रम नोंदवता येतील.

**खासगी संस्थांना मुलाखती घेण्यास परवानगी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व जागा मुलाखतीशिवाय (केवळ गुणांच्या आधारे) भरल्या जातील. तर खासगी संस्थांना १ जागेसाठी १० उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावण्याचा अधिकार असेल. उमेदवारांना त्यांच्या गुणवत्तेनुसार आणि पात्रतेनुसार विविध शाळांचे पसंतीक्रम ऑनलाईन निवडता येणार आहेत. त्यामुळे शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे शाळांमधील शिक्षकांचा तुटवडा दूर होऊन शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत होईल, असा विश्वास शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

-------------

### लाडकी बहीण योजना

या प्रक्रियेला नोव्हेंबर २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत अनेकदा मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर ३० एप्रिल ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली. या प्रक्रियेची पूर्तता करण्यासाठी बाधित झालेल्या सुमारे ४ लाख लाभार्थींना आणखी एक संधी मिळावी या उद्देशाने, अंतिम मुदत ३० एप्रिलपर्यंत वाढवण्यात आली होती. आम्ही मार्च आणि एप्रिल महिन्यांचे हप्ते अद्याप वितरित केलेले नाहीत. येत्या काही दिवसांत जेव्हा आम्ही हे हप्ते वितरित करू, तेव्हा पात्र लाभार्थींची नेमकी संख्या स्पष्ट होईल, असे महिला व बाल कल्याण विभागातील एका अधिकाऱ्याने सांगितले.

---------

### आता महिला शेतकरीही सक्षम व आत्मनिर्भर

देऊ शकतात. अशा प्रदर्शनांमुळे महिलांना आत्मविश्वास मिळून त्या नव्या संधींचा लाभ घेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला नारायण काशीद, दादा मुंडे, ॲड. विशाल कदम, सुहास पाटील, गणेश राऊत, बंडू जटाळ, कैलास रकटे, रमेश सानप, ॲड. गणेश कराडे, संयोजक महेश बेद्रे, कार्याध्यक्ष शिवराम घोडके यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी दादासाहेब मुंडे यांनीही आपले मनोगत व्यक्त करत आयोजक महेश बेद्रे यांच्या कार्याचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे शेतकऱ्यांना नव्या संधी उपलब्ध होत असून शेती क्षेत्रात सकारात्मक बदल घडत असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन संयोजक महेश बेद्रे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक जगताप सर यांनी केले कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचा मार्ग दाखवण्याचा प्रयत्न होत असून, विशेषतः महिला शेतकऱ्यांसाठी हे प्रदर्शन प्रेरणादायी ठरत आहे.

**या शेतकऱ्यांचा झाला पुरस्कार देऊन सन्मान**

डॉ. हनुमान गरुड, महेश नागरगोजे, शोभा काळे, संजय सानप, जयराम गायकवाड, वैजनाथ वांजरखेडे, डॉ. बाबासाहेब ठोंबरे या प्रगतशील शेतकऱ्यांना ‘‘ किसान कृषीरत्न पुरस्कार २०२६ ’’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांच्या नाविन्यपूर्ण शेती पद्धती आणि उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांकडून त्यांचे विशेष कौतुक करण्यात आले.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. ०६ मे २०२६
३

## थोडक्यात



सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्र च्या वतीने दिला जाणार आदर्श सरपंच पुरस्कार पात्रुड गावच्या सरपंच सौ. नौशाद लतीफ मोमीन यांना मिळाला त्याबद्दल लतीफ मोमीन यांना शुभेच्छा देताना पत्रकार राजरत्न डोंगरे, आनिस अन्सारी पृथ्वीराज निर्मळ, नईम आतार, एजाज खतीब तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## बारावीच्या निकालात योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयाचे उज्वल यश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी (विज्ञान) महाविद्यालयाने दैदिप्यमान यशाची परंपरा कायम ठेवली असून विज्ञान शाखेचा निकाल ९८.१० टक्के लागला असून जागृती जयदीप विर्धे ८६ टक्के गुण प्रथम, मोहित सुमेश पुजारी,शुभम मधुकर शिंदे यांनी ८१ टक्के गुण मिळवून अनुक्रमे द्वितीय व तृतीय

पाली विषयात १३ विद्यार्थ्यांनी १०० गुण मिळविले तर पवन नवनाथ भोजने याने संस्कृत विषयात १०० गुण व व्होकेशनल शाखेचा निकाल ६२.५० टक्के आहे.

कला/वाणिज्य : स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या बारावी वाणिज्य विभागाचा ९०.६९% तर कला विभागाचा ८७.२३% निकाल लागला आहे.अजय रामेश्वर ओव्हाळ ८९. ५०% गुण प्रथम क्रमांक , यश अभयकुमार लोढा ८७. ८३% द्वितीय तर पार्थ विश्वास आजबे ७७. ५०%) तृतीय कला शाखा – कृष्णा विठ्ठल फफाळ ८१.८३% गुण प्रथम क्रमांक, समर्थ अनंत मसने ८१.५०% द्वितीय, तर सलोनी धनंजय जोगदंड ७४. ६७%) तृतीय क्रमांक या क्रमाने उज्वल यश प्राप्त केले आहे. या यशाबद्दल योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर, सचिव कमलाकर चौसाळकर,कार्यकारी उपाध्यक्ष ॲड. जगदीश चौसाळकर, कोषाध्यक्ष डॉ.शैलेश वैद्य, सहसचिव भीमाशंकर शेटे,इतर संचालक प्राचार्य डॉ.एम.व्ही. कानेटकर,प्राचार्य डॉ. पी.एस.देशमुख आदीसह प्राध्यापक, कर्मचारी यांनी गुणवंतांचे अभिनंदन केले आहे.

## ॲड.अशोक कवडे यांचा अंबाजोगाई वकील संघाच्या अध्यक्षपदी विजयी झाल्याबद्दल सत्कार



घाटनांदुर । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील जिल्हा न्यायालय वकील संघाच्या वार्षिक निवडणुकीत ड. अशोक बाळासाहेब कवडे यांनी भरघोस मतांनी यश मिळवून अध्यक्ष पदी विजयी मिळवल्याबद्दल ड . अशोक कवडे यांचा सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे तसेच गोरगरिबांच्या मदतीला धावणारे त्यामुळे यामुळे नागरिकांतून मोठ्या उत्सवात अभिनंदन करण्यात येत आहे त्यातच पत्रकार परमेश्वर वैद्य व ड.सुरज शेटे यांच्या वतिनेही शाल, श्रीफळ, पेढे देऊन मोठ्या उत्साहात सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या

# प्रशासकीय बदल्यांचा 'फार्स' सीईओ जितिन रेहमान यांनी थांबवावा
## अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली जुन्याच ठिकाणी प्रतिनियुक्त्या

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या क व ड संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या ७ व ८ मे रोजी समुपदेशनाद्वारे होणार असल्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांनी जारी केले आहेत. मात्र, मागील काही वर्षांच्या अनुभवावरून या बदल्या केवळ औपचारिकता ठरत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे यांनी केला आहे.

डॉ. ढवळे यांच्या म्हणण्यानुसार, बदल्या झाल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांना इतर विभागात किंवा तालुक्यात पाठविण्याऐवजी अतिरिक्त कामकाज या नावाखाली पुन्हा त्याच विभागातच कार्यरत ठेवले जाते. त्यामुळे प्रत्यक्षात बदल्यांचा उद्देशच फोल ठरत असून प्रशासनाचा हा प्रकार फार्स असल्याची तीव्र प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.

याबाबत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रेहमान यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन दिले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. तसेच या प्रकरणी मुख्यमंत्री, पालकमंत्री, ग्रामविकास मंत्री आणि विभागीय आयुक्त यांना निवेदन देत आंदोलनाचा इशाराही दिला आहे.



दरम्यान, जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम व आरोग्य विभागांमध्ये विभागप्रमुखांकडून मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. विभागीय आयुक्तांची परवानगी न घेता प्रतिनियुक्तीऐवजी अतिरिक्त कामकाज या नावाखाली आपल्या मर्जीतील कर्मचाऱ्यांना पुन्हा त्याच ठिकाणी ठेवण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. सध्या १०० हून अधिक कर्मचारी अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली महत्त्वाच्या पदांवर कार्यरत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

प्रजासत्ताक दिनानंतरही आदेश केवळ कागदावरच

प्रजासत्ताक दिनी आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर २२ जानेवारी रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) प्रदीप काकडे यांनी सर्व विभागप्रमुखांना अतिरिक्त पदभार कमी करून कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू करण्याचे आदेश दिले होते. मात्र हे आदेश प्रत्यक्षात राबविण्यात आले नसल्याचा आरोप डॉ. ढवळे यांनी केला आहे.

यामुळे पुन्हा एकदा जिल्हा प्रशासनाला आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून, प्रशासकीय बदल्यांचा दिखावा थांबवून पारदर्शक कारभार करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## ढेकनमोहा येथे महाकारूणी तथागत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी

ढेकणमोहा । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील ढेकणमोहा येथे महाकारुणी तथागत गौतम बुद्ध तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व पंचशील ध्वजारोहणाने झाली.

युवा रिपाइंचे प्रदेश अध्यक्ष पप्पूजी कागदे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. त्यानंतर दुपारी ४ वाजता पूज्य भिक्खू धमशिल थेरो (शिवणी) यांच्या उपस्थितीत भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. या मिरवणुकीत सुमारे ७० भंतेजींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. यामुळे सारा परिसर दुमदुमून गेला.



मिरवणुकीनंतर पूज्य भिक्खू धमशिल थेरो यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी समता, बंधुता व शिक्षणाचा संदेश देत समाजाने या विचारांवर चालण्याचे आवाहन केले. लहान मुलांच्या भाषणांचा कार्यक्रम पार पडला. बालकांनी बुद्ध व आंबेडकरांच्या जीवनकार्यावर प्रभावी विचार मांडले. सायंकाळी साक्षी साळवे यांचा गायनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रसंगी पप्पु कागदे युवा प्रदेश अध्यक्ष रिपाइं, पु भिकुखु धमशिल थेरो, पोलीस उपनिरीक्षक आत्माराम गर्जे, अरुण नाना डाके माजी सभापती, किशनराव तांगडे रिपाइं तालुका अध्यक्ष, महादेव दादा उजगरे वडवणी तालुका अध्यक्ष, शाहुराव डोळस रिपाइं जिल्हा अध्यक्ष दिव्याग, सुधीर काकडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष, भगीरथ बांडे माजी सरपंच, बंडु नाना घूमरे सरपंच वलीपुर, वसंत गुंदेकर माजी सरपंच, विक्रम डोळस, बालापसाद जाजु चेअरमन, परमेश्वर थापडे उपसरपंच, भारत देवकाते शिवसेना उपतालुकाप्रमुख, नारायण देवकते ग्रामपंचायत सदस्य, शरद देवकते, सतिश शिनगारे, भिमराव घोडेराव, प्रा.आमीत सवाई, राहुल कोरडे, युवराज जाधव, बळीराम थापडे, गणेश प्रधान, संतोष देशमुख सर कपिल तांगडे, रुद्रा मिसळे, महादेव थापडे आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी दिलीप शिंदे, नागेश शिंदे, नंदू शिंदे, अरविंद शिंदे, दयाराज शिंदे, सखाराम शिंदे, विनोद शिंदे, विकास शिंदे, बापू शिंदे, बाबासाहेब शिंदे, बाबासाहेब डोंगरे ,विपिन शिंदे, महादेव शिंदे, अजय शिंदे, प्रकाश शिंदे, आनंद शिंदे, पोपट शिंदे, प्रभाकर शिंदे, दादा किसन शिंदे, बारीक शिंदे, वसंत शिंदे, कृष्णा शिंदे, समाधान शिंदे,कृष्णा ससाने, रमेश शिंदे, शहादेव शिंदे, विकी शिंदे, विश्वनाथ शिंदे, किसन शिंदे, राजेंद्र साळवे, दत्ता शिंदे, ऋषिकेश शिंदे, विश्वजीत शिंदे, अभिजीत शिंदे, रघुनाथ शिंदे, अरुण शिंदे पोपट शिंदे, भगवान शिंदे,राहुल शिंदे, आकाश शिंदे, युवराज गायकवाड, सुनील शिंदे , कृष्णा शिंदे, दिनेश पिसाळ, दिनकर येवले, चत्रभुज थापडे, डॉ.किशोर डोंगरे, संतोष ससाणे, रमेश जावळे, रमेश शिंदे, कचराप्पा शिंदे, नवनाथ शिंदे,धम्मानंद शिंदे,गोरख चौरे यांच्यासह जयंती उत्सव समितीच्या वतीने विशेष परिश्रम घेण्यात आले,

## पान ६ वरुन...

### तिकाडे वस्ती पर्यंतचा

यावेळी धर्मराजशिदे,प्रकाश सालपे, सतोष मिसाळ, रमेश मिसाळ, श्रीनिवास राऊत, प्रदिप बोराडे, भागवत गायकवाड, ञ्यबक शिदे, साईनाथ शिदे, आरूण तिकाडे, आश्रुबा शेळके, कृष्णा शिदे,स्वप्निल गायकवाड याच्यासह प्रस्तावित गटातील शेतकरी खातेदार याच्या समक्ष शेतरस्ता वहिवाटिस खुला करून तसा स्थळपाहणी पचनामा, समतीपत्र, व ग्रामपंचायत शेतरस्ता/ पानदरस्ता खडिकरण करण्यासाठी मागणी अर्ज, व गटाच्या इतर हक्कात नोदी करण्यासाठी अवश्यकते सह्या व कागदपत्र उपलब्ध करून देण्यात आले. यामुळे अनेक वर्षापासून प्रलंबित आसणारा शेतरस्ता वहिवाटी योग्य करून घेण्यात आला. यामुळे पिडीत शेतक-यानी मा. तहसिलदार, मडळधिकारी, तलाठी, उपसपच, ग्रामरस्ता समिती, याचे आभार मानले.

### पाटोदा प्रशासनाचा

आदेश असतानाही तहसीलदार, बीडीओ आणि जिल्हाधिकारी कार्यालय एकमेकांकडे बोटे दाखवत आहेत.या प्रशासकीय टोलवा-टोलवीत शेतकरी मात्र देशोधडीला लागला आहे.गणेश कवडे यांचा निर्वाणीचा इशारा शेतकरी नेते गणेश कवडे यांनी प्रशासनाला धारेवर धरत स्पष्ट केले की, प्रशासनाची ही 'गेंड्याची कातडी'आता जनता सहन करणार नाही.प्रशासनाने आता तरी आपले झोपेचे सोंग सोडावे.येत्या आठ दिवसांत विहिरींच्या दुरुस्तीचा निधी आणि घरांच्या पडझडीची मदत सर्व बाधित नागरिकांच्या बँक खात्यावर जमा झाली नाही,तर पाटोदा तहसील कार्यालयाचा उंबरठा ओलांडू देणार नाही. तिथेच 'बोंबाबोंब आंदोलन' करून अधिकाऱ्यांना जाब विचारला जाईल! गणेश कवडे शेतकरी नेते.तातडीने निधी वाटप सर्व बाधित घरांना तात्काळ आर्थिक मदत मिळावी.विहिरींचे पुनरुज्जीवन तांत्रिक मुद्दे बाजूला सारून 'रोहयो'चा निधी विनाविलंब वर्ग करावा.जनावरांची मदत सक्ती न करता पंचनाम्यानुसार नुकसान भरपाई द्यावी. प्रशासनाच्या या 'तुघलकी' कारभाराविरुद्ध आता जनक्षोभ उसळला असून,संपूर्ण तालुक्याचे लक्ष आता आठ दिवसांच्या अल्टिमेटमकडे लागले आहे.

### वडवणीतील अतिक्रमनावर

नहार यांना कोर्टात न्याय मिळू शकला नाही.सेवा सहकारी सोसायटी यांनी जागा खाली करण्यासाठी काही दिवसाचा कालावधी दिला होता. तो कालावधी संपल्यानंतर मंगळवार दि ५ रोजी अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले. बांधकाम पाडण्यासाठी सेवा सहकारी सोसायटीने निधी उपलब्द करून दिल्याने नगरपंचायत यंत्रणेने ही अनाधी कृत बांधकाम पाडण्याची कार्यवाई करण्यात आली.

### बीड स्थानिक गुन्हे शाखेकडून

२) रेहान इलाही शेख (वय १९ वर्षे, रा. चांदनगर, लातूर)

आरोपींकडून पेठबीड येथून चोरी झालेला टेम्पो जप्त करण्यात आला आहे. तसेच, अधिक तपासात या आरोपींनी लातूर येथील विवेकानंद पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एक पिकअप गाडी चोरल्याची कबुली देखील दिली आहे. या दोन्ही आरोपींना मुद्देमालासह पेठबीड पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, मारुती कांबळे, बाळू सानप, सोमनाथ गायकवाड, युनुस बागवान, अश्पाक सय्यद, मनोज परजणे, आश्विन सुरवसे आणि चालक अतुल हराळे यांनी पार पाडली.

### अंबाजोगाईत जनप्रबोधनपर

असणारे हे कलाकार त्यांना अंबाजोगाई मध्ये हा कला मंच गेल्या अनेक वर्षांपासून न्यूज लोकमनच्या वतीने आम्ही उपलब्ध करून दिला आहे अशी माहिती आयोजक राजेश इंगोले यांनी यावेळी प्रसिद्धी माध्यमांना दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ राजेश इंगोले यांच्यासह न्यूज लोकमनचे संपादक संजय जोगदंड, महादेव माने, विकास एडके, तुकाराम सुवर्णकार, गणेश काळे प्रयत्न करीत आहेत. या कार्यक्रमासाठी अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध गायक कलावंत राजकुमार ठोके, बळीराम उपाडे, गौतम सरवदे, सुभाष शेप, राजाभाऊ इंगळे, शिरसाट, विकास एडके, महादेव माने, राहुल सुरवसे, आसाराम जोशी, प्रदीप चोपने, अमोल तरकसे, नारायण साठे, महेश गीते, वशिष्ठ काचगुंडे, स्विथम इंगळे, रफिक शेख यांच्यासह सुप्रसिद्ध गायिका विद्या बनसोडे, मयुरी मजगे, क्रांती एडके, रोहिणी गायकवाड व धनश्री यादव हे भीमगीतांचा नजराना सर्व रसिक प्रेक्षकांसमोर पेश करणार आहेत. तरी अंबाजोगाई परिसरातील आंबेडकरवादी आंबेडकर प्रेमी जनतेने या जनप्रबोधनपर क्रांतिकारी भीमगीतांचा जलशासाठी उपस्थित राहून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांना आणि कार्याला अभिवादन करण्यासाठी हजर राहावे असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात येत आहे.

### महिला स्वत:च्या पायावर

महिलांनी हक्क अधिकार यासाठी लढाई स्वतः लढली पाहिजे. महिला पूर्वी व आज तसेच वर्तमानात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत असून आपले घर,संसार आणि सामाजिक जबाबदारी पार पाडत असते महिलांसाठी विविध कायदे असून देखील महिलांवर अन्याय अत्याचाराच्या घटना व्हायला न पाहिजेत आधुनिक काळात महिलांची कामगिरी उल्लेखनीय आहे यापुढेही महिलांनी आपापल्या क्षेत्रात काम करत असताना आपला स्वाभिमान, आत्मसन्मान बाळगतील हा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.यावेळी त्यांचे संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले.यावेळी संस्था पदाधिकारी, शिक्षक,कर्मचारी उपस्थित होते.

### पुरुष कर्मचाऱ्यांनी

९ मार्चपासून तीन हजारवर कर्मचारी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण आणि अन्नत्याग आंदोलन करत आहे. विशेष म्हणजे समग्र शिक्षा अभियान अंतर्गत दिव्यांग विभागातील अर्ध्या कर्मचाऱ्यांना २०२४ मध्ये सेवेत नियमित करण्यात आले. एकाच अभियानातील अर्धे कर्मचारी कायम व सेवाजेष्ठ कर्मचारी कंत्राटी असल्याने राज्यात असंतोषाचे वातावरण आहे. सन २००१ पासून समग्र शिक्षा अभियान सुरू झाले. त्याच वेळी विद्यार्थ्यांना गुणवत्ता पूर्ण शिक्षण व शिक्षकांना मार्गदर्शन व्हावे यासाठी विषयसाधन व्यक्ती, विशेष शिक्षक, डेटा एंट्री ऑपरेटर, लेखा, एम आय एस कोऑर्डिनेटर, इंजिनिअर, जिल्हा समन्वयक, सहायक कार्यक्रमाधिकारी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील विविध पदावर असणारे कर्मचारी, अशी अनेक पदे सहा-सहा महिन्यांच्या करारावर व मानधन तत्त्वावर भरली गेली होती. गत २० ते २५ वर्षात प्रत्यक्ष सेवेदरम्यान तब्बल २५७ कर्मचारी विविध कारणाने मृत्यूमुखी पडले.

## ऊसतोड कामगाराच्या लेकीची गरुडझेप; पुनम मुंडेची महाराष्ट्र पोलीस दलात निवड!

वडवणी प्रतिनिधी

जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर एखादी व्यक्ती शून्यातून विश्व कसं निर्माण करू शकते, याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे कु. पुनम बळीराम मुंडे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत पुनमने महाराष्ट्र पोलीस दलात 'नवी मुंबई पोलीस' म्हणून आपली मोहोर उमटवली आहे. तिच्या या यशामुळे केवळ तिच्या कुटुंबाचाच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्याचा मान उंचावला आहे.



कष्टातून घडले यशाचे लेणे

पुनमची कौटुंबिक परिस्थिती अत्यंत हलाखीची होती. तिचे आई-वडील आणि भावंडे ऊसतोडणीचे काम करून संसाराचा गाडा ओढतात. अंगावर ऊन-वारा झेलत, रक्ताचे पाणी करून आई-वडिलांनी पुनमला शिक्षणासाठी बळ दिले. आपल्या कुटुंबाचे हे कष्ट वाया जाऊ द्यायचे नाहीत, या एकाच जिद्दीने पुनमने मैदानी सराव आणि अभ्यासावर आपले लक्ष केंद्रित केले होते. पुनमच्या या यशात तिची शैक्षणिक शिस्त आणि मार्गदर्शकांचा मोठा वाटा आहे: पुनम ही प्रा.डोईफोडे सरांचे वडवणी येथील नामांकित ज्ञानगंगा गुरुकुल वडवणी (२०२२ बॅच) ची विद्यार्थिनी असून, तिथेच तिच्या यशाची खऱ्या अर्थाने पायाभरणी झाली. त्यानंतर तिने लो. सावरगाव (अंबाजोगाई) येथील दत्ता दराडे सर यांच्या 'ज्ञानदीप अकॅडमी मध्ये पोलीस भरतीचे शास्त्रोक्त प्रशिक्षण आणि कठोर परिश्रम घेतले. अखेर तिच्या मेहनतीला फळ मिळाले असून तिची निवड नवी मुंबई पोलीस पदी झाली आहे. परिस्थिती गरिबीची असली तरी स्वप्ने मोठी पाहण्याची ताकद आणि ती पूर्ण करण्याची जिद्द असेल, तर आभाळही ठेंगणे वाटते, हे पुनमने सिद्ध केले आहे.

सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव

पुनमच्या या यशाबद्दल ज्ञानगंगा व शिवालय गुरुकुल परिवार, ज्ञानदीप अकॅडमी आणि मुंडे कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ग्रामीण भागातील तरुण-तरुणींसाठी पुनमचा हा प्रवास अत्यंत प्रेरणादायी ठरत आहे. पुनम मुंडे आणि तिच्या कष्टाळू आई-वडिलांचे मनःपूर्वक अभिनंदन आणि भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

## भाजपाची तीन राज्यात सत्ता आल्याबद्दल माजलगाव भाजपाच्या वतीने जल्लोष

माजलगाव । प्रतिनिधी

पश्चिम बंगाल आसाम पाँडिचेरी या तीन राज्यात भाजपाची एकहाती सत्ता आल्याबद्दल माजलगाव भाजपाच्या वतीने जल्लोष करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज चौक माजलगाव येथे आतिश बाजी करत भारतीय जनता पार्टीचा विजय असो वंदे मातरम भारत माता की जय देश का नेता कैसा हो नरेंद्र मोदी जैसा हो पंकजा मुंडे तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है या घोषणाने विजय उत्सव साजरा केला यानंतर पेढे रसगुल्ले व झालमुडी खाऊन सर्व भाजप पदाधिकारी यांनी आनंद व्यक्त केला. ३७० कलम असो की राष्ट्रवाद डॉक्टर शामाप्रसाद मुखर्जी यांची दूरदृष्टी व विचारांचा मार्ग आज अभतपूर्व यश मिळवून देणारा ठरला. व



पंतप्रधान मोदी यांनी २०४७ ची विकसित भारताची दिशा निश्चित केली . भयमुक्त बंगाल सुरक्षित बंगाल नारा हा सर्वसामान्य मतदारांनी स्वीकारला. कणखर गृहमंत्री अमित भाई शहा यांच्या राजकीय धोरणांचा हा विजय आहे व राज्याचे विकासासाठी नव्या अशा आणि संधी निर्माण करणारा आजचा विजय ठरेल. आसाम मध्ये व पॉडेचेरीमध्ये देखील सरकारच्या विकास विकासाभिमुख व नेतृत्व कार्यावर जनतेने पुन्हा विश्वास ठेवत नेतृत्व स्वीकारले. हा विजय उत्सव साजरा करताना भाजपाचे ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर मेंडके भाजपा शहर मंडळाध्यक्ष विनायक रत्नपारखी रूपाली कचरे हनुमान कदम कैलास खुरपे दत्ता महाजन रामेश्वर चव्हाण सुनील दळवी त्यांच्या सह भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आदित्य कृषी अभियांत्रिकी महाविद्यालयात 'बायोगॅस'चा जागर; कचऱ्यातून होणार ऊर्जा निर्मिती

### एलपीजी खर्चात कपात; सेंद्रिय स्लरीचा बागेसाठी होणार वापर

**बीड । प्रतिनिधी**

**पर्यावरण संरक्षण आणि अक्षय ऊर्जेच्या वापराकडे एक पाऊल टाकत, शहरातील आदित्य कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात नवीन बायोगॅस प्लांटची यशस्वीरीत्या जोडणी करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे महाविद्यालयाचा परिसर आता 'झिरो वेस्ट' (शून्य कचरा) मॉडेलकडे वाटचाल करणार असून, कॅन्टीन आणि हॉस्टेलमधील सेंद्रिय कचऱ्यापासून गॅस निर्मिती केली जाणार आहे.**

आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या प्रेरणेतून कॅम्पसमध्ये शाश्वत विकासाचे विविध उपक्रम राबवले जातात. याच मालिकेत हा बायोगॅस प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे.



या प्रकल्पाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे संचालक, प्राध्यापक आणि विद्यार्थी प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे आदित्य महाविद्यालयाने शिक्षण क्षेत्रासोबतच पर्यावरण संवर्धनातही आपला वेगळा ठसा उमटवला असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या प्रकल्पामुळे एलपीजी सिलिंडरवर होणारा मोठा खर्च आता कमी होणार आहे, कचरा व्यवस्थापन सोपे झाल्याने कॅम्पस स्वच्छ राहील, कृषी अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना बायोगॅस तंत्रज्ञानाचे व्यावहारिक ज्ञान मिळेल, रासायनिक खतांचा वापर थांबवून दर्जेदार सेंद्रिय खताची निर्मिती होईल.

असा आहे प्रकल्प

या प्रकल्पाची क्षमता ६ क्यूबिक मीटर आणि १ क्यूबिक मीटर अशी असून, यामध्ये प्रामुख्याने कॅन्टीनमधील भाजीपाल्याचे अवशेष, उरलेले अन्न, शेण, पालापाचोळा आणि इतर सेंद्रिय कचरा वापरला जाणार आहे. या प्रक्रियेतून निर्माण होणारा गॅस स्वयंपाकासाठी वापरला जाणार असून, उरलेली स्लरी (द्रव खत) महाविद्यालयातील रोपवाटिका आणि बागकामासाठी वापरण्यात येईल.

हा प्लांट केवळ ऊर्जा बचतीचे साधन नसून विद्यार्थ्यांना शाश्वत विकासाचे प्रत्यक्ष धडे देणारे केंद्र ठरेल. स्वच्छ कॅम्पस, हरित कॅम्पस हे आमचे ध्येय आहे.

-डॉ. आदिती सारडा, संचालक

# हरभरा उत्पादक अडचणीत; बाजारात दर घसरले, प्रति क्विंटल मोठा तोटा

पुणे : हरभरा उत्पादकांसाठी दुहेरी संकटाची परिस्थिती निर्माण झाली आहे. शासकीय खरेदी बंद झाल्याने बाजारात दर तब्बल ६०० ते ८०० रुपयांनी घसरले असून, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. हमीभाव असतानाही कमी दरात विक्री करावी लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे.

हरभरा उत्पादकांसाठी दुहेरी संकटाची परिस्थिती निर्माण झाली आहे. शासकीय खरेदी बंद झाल्याने बाजारात दर तब्बल ६०० ते ८०० रुपयांनी घसरले असून, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. हमीभाव असतानाही कमी दरात विक्री करावी लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. हरभरा उत्पादक शेतकऱ्यांसमोर सध्या गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. शासकीय खरेदी प्रक्रिया अचानक थांबल्याने हमीभावाची अपेक्षा धुळीस मिळाली असून, शेतकऱ्यांना खासगी बाजारात कमी दरात माल विकण्याची वेळ आली आहे. परिणामी, प्रति क्विंटल ६०० ते ८०० रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे. शासनाने



हरभऱ्यासाठी ५,८७५ रुपये प्रति क्विंटल हमीभाव जाहीर केला असताना, सध्या खासगी बाजारात केवळ ४,५०० ते ५,३०० रुपये दर मिळत आहे. या मोठ्या तफावतीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. हरभऱ्याच्या उत्पादनासाठी बियाणे, खते, कीडनाशके, मजुरी यावर आधीच मोठा खर्च झाला आहे. आता कमी दर मिळाल्याने कर्जाचा बोजा वाढला. नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांपैकी सुमारे ३० ते ४० टक्के शेतकऱ्यांचा माल अजून खरेदी झालेला नाही. अनेकांनी

## शासकीय खरेदी बंद; खासगी बाजाराचा आधार

२४ एप्रिलपासून राज्यात हरभरा खरेदी प्रक्रिया थांबवण्यात आली आहे. कोटा पूर्ण झाला या कारणावरून ऑनलाइन पोर्टल बंद करण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात अनेक शेतकऱ्यांनी आधीच नोंदणी करूनही त्यांचा माल अजून खरेदीसाठी प्रलंबित आहे. पर्याय नसल्याने शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांकडे कमी दरात विक्री करावी लागत आहे.

हमीभावाच्या आशेने माल साठवून ठेवला होता. पण खरेदी बंद झाल्याने तोच माल आता अडचणीचे कारण ठरत आहे. हरभरा उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. एकीकडे उत्पादन खर्च वाढलेला असताना, दुसरीकडे हमीभाव न मिळाल्याने त्यांचे आर्थिक नुकसान वाढत आहे. जर लवकरात लवकर उपाययोजना केल्या नाहीत, तर याचा मोठा परिणाम शेतकऱ्यांच्या अर्थकारणावर होऊ शकतो.

# नागपुरी म्हैस देते ७०० ते १२०० लिटर दूध

राज्यात आणि देशात दुग्धव्यवसायाला हल्ली अधिकाधिक मागणी पहायला मिळते. काही गाय, म्हैस या अंदाजे १०, १५ ते अधिकाधिक १७ लिटरपर्यंत दूध देताना दिसतात. मात्र राज्यात अशा काही म्हशी आहेत त्या ७०० ते १२०० लिटरपर्यंत दूध देतात.

हे क्वचित ऐकायला मिळालं असलं तरीही हे खरे आहे. यामुळे शेती व्यवसायातील दुग्धव्यवसाय करणारे शेतकरी अधिकाधिक श्रीमंत होतील. नागपुरी जातीच्या म्हशीबद्दल आपण बोलत आहोत. नागपूरी ही एक म्हशींची विशिष्ठ जात आहे. ही जात नागपूर, अमरावती, अकोला येथे आढळते. राज्याबाहेर उत्तर भारत आणि आशिया खंडातही काही ठिकाणी आढळते. राज्यात तसेच देशात म्हशीचे पालन मोठया प्रमाणात होत आहे, अनेक



भूमिहीन व अल्पभूधारक शेतकरी जोडव्यवसाय म्हणुन म्हशीच्या पालणाकडे बघत आहेत. नागपुरी म्हशीच्या दुधात ७.७ % फॅट असते. तसेच गाईच्या दुधात ३.४ % फॅट असते.

दुग्धोत्पादनासाठी नागपुरी म्हशींना मका, सोयाबीन, भुईमूग, उसाचे बगॅस, ओट्स, सलगम आणि कसावा सोबत गवत आणि भुसा दिला जातो. तसेच नागपूरी म्हशींचे रंगरूप हे खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

नागपुरी म्हैस कशी दिसते?

नागपुरी म्हैस ही एका नजरेत ओळखता येते. इतर म्हशींपेक्षा ती खूप वेगळी असते. धष्टपुष्ट असते. तिला तलवारीसारखी दोन शिंगे असतात. तसेच तिची मान खूपच लांब आहे. या म्हशीची शेपटी ही आखूड असते. रेड्याहूनही म्हशींची उंची ही कमी म्हणजेच १३४ आहे. सर्वाधिक दूध देणाऱ्या जनावरांमध्ये नागपुरी म्हशीचं नाव अव्वल स्थानावर आहे.

# कांदा पिकावरील हा आहे सर्वात धोकादायक रोग

राज्यात मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादन घेतले जाते. कांदा पिकाचे उत्पादन घेताना शेतकऱ्यांना अनेक औषध फवारण्या कराव्या लागतात. मात्र, कांदा पिकावरील रोग नियंत्रण करण्यात शेतकऱ्यांना अपेक्षित यश मिळत नाही. कांद्यावरील सर्व रोगांमध्ये पीळ रोग हा सर्वात धोकादायक रोग मानला जातो. कांदा लागवडीनंतरच्या पहिल्या टप्प्यात हा रोग आढळून येतो. ज्यामुळे लागवडीनंतर ऐन कांदा रोप पीक अवस्थेत पदार्पण करत असताना, कांद्यावर हा रोग दिसून येतो. परिणामी, एकरी उत्पादनात मोठी घट होण्यास हा रोग कारणीभूत ठरतो.

कांदा हे राज्यातील महत्त्वाचे पीक आहे. याशिवाय देशातील अनेक राज्यांमध्ये कांद्याचे उत्पादन घेतले जाते. प्रामुख्याने वर्षातून तीन वेळा कांदा लागवड केली जाते. कांदा हा शाकाहारी आणि मांसाहारी दोन्ही पदार्थांमध्ये वापरला जातो. कांद्यामध्ये अनेक पौष्टिक आणि औषधी गुणधर्म देखील आढळतात. त्यामुळे त्याची मागणी कायम आहे. उत्पादन थोडे कमी झाले की भाव वाढतात? मात्र, गेल्या दोन ते तीन वर्षांपासून प्रतिकूल हवामान आणि योग्य भाव न मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पीळ रोगाची लक्षणे : कांद्यावरील पीळ रोगाची सुरुवातीची लक्षणे म्हणजे पानांवर पिवळे ठिपके पडतात. जे पानाच्या संपूर्ण भागावर पसरतात. या रोगाला ट्विस्टर किंवा स्प्रिंग असेही म्हणतात. कोलेटोट्रिचम बुरशीचे फिलामेंटस जमिनीत वर्षानुवर्षे आणि प्रभावित पिकांच्या अवशेषांमध्ये महिने टिकून राहू शकतात.

ज्यामुळे याचा संपूर्ण कांदा पिकावर विपरीत परिणाम होऊ शकतो. कांदा पिकावरील पीळ रोगाचे मुख्य कारण म्हणजे थ्रिप्स कीटक आहेत. कांदा पिकावर थ्रीप्स किडीचा प्रादुर्भाव असल्यास, हे थ्रिप्स कांद्याच्या मऊ भागांना संक्रमित करतात आणि त्यानंतर त्या ठिकाणी बुरशीची वाढ सुरू होते. आणि कांद्याच्या पिकावर पीळ रोगाचा प्रादुर्भाव वाढतो.


पीळ रोग नियंत्रणासाठीचे उपाय : कांदा पिकासाठी पाण्याचा योग्य निचरा होणारी जमीन निवडावी. कांद्याचे प्रमाणित बियाणे वापरावे. ज्यामुळे रोग नियंत्रणास मदत होते. २ किंवा ३ वर्षांनी पिकांची आलटून पालटून लागवड करावी. ज्यामुळे जमिनीची उपयुक्तता टिकून राहते. लागवड करताना रोपांच्या योग्य अंतरासाठी काळजी घ्या. मातीची परिक्षणासह खतांचा योग्य वापर करावा.

# जनांवरातील आम्लविषाराची लक्षणे आणि उपाय

जनावराच्या किण्वन पोटाचा सामू ५.८ ते ६.८ या दरम्यान असला पाहिजे तरच पचनाला योग्य वातावरण तयार होते. सामू कमी झाला आणि जास्त वेळ आम्ल स्वरूपात राहिला तर जनावर आम्ल विषार (ॲसिडोसिस) या आजाराला बळी पडते. किण्वन पोटातील ॲसिडोसिस हा दुभत्या जनावरांच्या पचन संस्थेशी संबंधित एक गंभीर आजार आहे, ज्यामुळे पशुपालकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि जनावरांचे शारीरिक नुकसान होते.

गाई, म्हशींच्या किण्वन पोटातील (रूमेन) पशुआहार, हिरवा व कोरडा चारा, सायलेज इत्यादीचे पचन ही एक किण्वन प्रक्रिया आहे. ज्यामध्ये हे सर्व कोट्यवधी जिवाणू व इतर सूक्ष्मजीव आहार पचवतात. ही सर्व प्रक्रिया ऑक्सिजन विरहित वातावरणात होते. म्हणजेच पचनाच्या वेळी किण्वन पोटात प्राणवायू नसतो, तर कार्बन डायऑक्साइड व मिथेन हे वायू असतात. किण्वन पोटातील पाचक रसामध्ये विविध प्रकारचे जिवाणू हे विविध विकर (एन्झाइम्स) स्रवतात. त्याद्वारे चाऱ्यातील तंतुमय खाद्यातील प्रथिने, कर्बोदके आणि तेल इत्यादींचे पचन होते. गाई, म्हशींच्या पोटात ही फर्मेंटेशन प्रक्रिया अखंडपणे सुरू असते. या सर्वांत मोलाची भूमिका बजावतो तो किण्वन पोटाचा सामू. (आम्ल व अल्कली यांचा समतोल) किण्वन पोटाचा सामू ५.८ ते ६.८ या दरम्यान असला पाहिजे, तर पचनाला योग्य वातावरण तयार होते. सामू कमी झाला आणि जास्त वेळ आम्ल स्वरूपात राहिला तर जनावर ॲसिडोसिस या आजाराला बळी पडते. किण्वन पोटातील ॲसिडोसीस हा दुभत्या जनावरांच्या पचनसंस्थेशी संबंधित एक गंभीर आजार आहे, ज्यामुळे पशुपालकांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि जनावरांचे शारीरिक नुकसान होते.ॲसिडोसिसमुळे होणारे नुकसान : आजारी जनावरांच्या दूध उत्पादनात अचानक मोठी घट येते. अभ्यासानुसार, तीव्र ॲसिडोसिसमुळे दररोज प्रति गाय सुमारे ३ लिटरपर्यंत दूध उत्पादन कमी होऊ शकते. दुधातील फॅट (स्निग्धांश) आणि प्रथिनांचे प्रमाण (एसएनएफ) लक्षणीयरीत्या कमी होते, ज्यामुळे दुधाला योग्य दर मिळत नाही.

आरोग्यावर होणारे परिणाम : किण्वन पोटाचा सामू ५.८ च्या खाली गेल्यामुळे अन्नाचे पचन कमी होते, ज्यामुळे जनावरांना भूक लागत नाही. पोटातील आम्लामुळे यकृतात गळू तयार होतात,



ज्यामुळे जनावराची रोगप्रतिकारशक्ती कमी होते. जनावरांना तीव्र जुलाब होतात आणि पोटात गॅस धरल्याने पोट फुगण्याची समस्या निर्माण होते. ॲसिडोसिसचा थेट परिणाम जनावरांच्या खुरांवर होतो, ज्यामुळे ती लंगडतात. हा परिणाम दीर्घकाळ टिकणारा असतो.

आर्थिक नुकसान : जनावरांच्या औषधोपचारासाठी मोठा खर्च करावा लागतो. तीव्र ॲसिडोसिसमध्ये योग्य वेळी उपचार न मिळाल्यास २४ ते ७२ तासांच्या आत जनावराचा मृत्यू होऊ शकतो, ज्यामुळे पशुपालकाचे मोठे नुकसान होते. प्रति जनावर प्रति वर्ष (८०० ते १००० लिटर) इतके दूध कमी निघते. दुभत्या जनावरांमधील रुमिनल ॲसिडोसिस प्रामुख्याने आहारातील असंतुलनामुळे होतो, ज्यामुळे किण्वन पोटामध्ये अतिरिक्त आम्ल तयार होते. याचे सर्वांत सामान्य कारण म्हणजे मका, गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी इत्यादी धान्य आणि साखर यांसारख्या लवकर आंबणाऱ्या कर्बोदकांचे मोठ्या प्रमाणात सेवन करणे, ज्यामुळे अस्थिर मेदाम्ले (व्होलाटाइल फॅटी ॲसिड्स) आणि लॅक्टिक ॲसिड तयार होऊन रुमेनचा सामू कमी होतो. तंतुमय घटकांची कमतरता असलेल्या आहारामुळे रवंथ करण्याची क्रिया आणि लाळेचे उत्पादन कमी होते, जे किण्वन पोटाची आम्लता नियंत्रित करण्यासाठी आवश्यक असतात. आहारात अचानक बदल, विशेषतः जास्त प्रमाणात पशुखाद्याकडे वळणे, किण्वन पोटाचे सूक्ष्मजैविक संतुलन बिघडवू शकते. अति खाणे आणि जास्त धान्ययुक्त आहाराशी जुळवून घेण्यास लागणारा वेळ आणि निवडक खाद्य सेवन (जिथे गाई चाऱ्यापेक्षा जास्त धान्य निवडून खातात) यामुळे धोका आणखी वाढतो.रुमिनल ॲसिडोसिस : दुभत्या जनावरांमधील रुमिनल ॲसिडोसिस तीव्र (ॲक्यूट) आणि उपतीव्र (सबॲक्यूट) रुमिनल ॲसिडोसिस या दोन मुख्य प्रकारांमध्ये आढळतो. तीव्र रुमिनल ॲसिडोसिसमध्ये रुमेनचा सामू पाचच्या खाली झपाट्याने घसरतो. हे सहसा धान्यांसारख्या आंबविण्यायोग्य कर्बोदकांचे मोठ्या प्रमाणात अचानक सेवन केल्यामुळे होते. यामुळे लॅक्टिक ॲसिड तयार करणाऱ्या जिवाणूंची वेगाने वाढ होते, ज्यामुळे अत्यंत आम्लयुक्त वातावरण निर्माण होते आणि त्यामुळे जनावराचे गंभीर नुकसान किंवा मृत्यू देखील होऊ शकतो. तीव्र ॲसिडोसिसच्या लक्षणांमध्ये अचानक पोट फुगणे, अतिसार आणि गंभीर प्रकरणांमध्ये आडवे पडून राहणे किंवा मृत्यू यांचा समावेश होतो. दुसरीकडे, उपतीव्र रुमिनल ॲसिडोसिस हा दुभत्या जनावरांमध्ये अधिक सामान्यपणे आढळतो. हे तेव्हा घडते जेव्हा किण्वन पोटाचा सामू हा दररोज अनेक तासांसाठी ५.२ ते ५.६ च्या दरम्यान कमी-जास्त होत राहतो आणि अनेकदा याची कोणतीही स्पष्ट वैद्यकीय लक्षणे दिसत नाहीत. आजाराचे निदान : दुभत्या जनावरांमधील रुमिनल ॲसिडोसिसचे निदान करण्यासाठी गोठ्यातील निरीक्षण, गोठ्यातील तपासणी आणि प्रयोगशाळा चाचण्या यांचा एकत्रितपणे वापर केला जातो. सर्वांत निश्चित पद्धत म्हणजे रुमेनोसेंटेसिस, ज्यामध्ये सुई टोचून किण्वन पोटातील द्रव गोळा केला जातो आणि त्याचा सामू मोजला जातो. तपासलेल्या २५ टक्क्यांपेक्षा जास्त गाईंमध्ये सामूचे मूल्य ५.५ पेक्षा कमी असणे हे सामान्यतः सबॲक्यूट रुमिनल ॲसिडोसिस दर्शवते. शक्यतो टी एम आर दिल्यानंतर ४ ते ८ तासांनी किंवा खाद्य / खुराक दिल्यानंतर २ ते ४ तासांनी पीएच मीटर किंवा इंडिकेटर पेपर वापरून सामूचे मूल्यांकन केले जाते. ही प्रक्रिया तुलनेने सोपी असली, तरी त्यासाठी कौशल्याची आवश्यकता असते आणि ती प्रशिक्षित कर्मचाऱ्यांनीच केली पाहिजे. मोठ्या डेअरी फार्ममध्ये हे अव्यवहार्य असू शकते, जिथे या प्रक्रियेदरम्यान जनावरांना अतिरिक्त ताण येतो. त्यामुळे आहारातून बफर घटक जातील याची दक्षता घेणे उत्तम ठरते. परदेशातील फार्म वर किण्वन पोटात बसवलेले पी एच सेन्सर्स सतत निरीक्षण करतात आणि दीर्घकाळ कमी सामू झालेल्या वेळा शोधू शकतात. अप्रत्यक्ष पद्धतींमध्ये शेणाचा फेसयुक्तपणा किंवा न पचलेले धान्य यांसारख्या लक्षणांसाठी तपासणी करणे, रवंथ कमी होणे हे देखील अपुऱ्या फायबर सेवनाचे आणि ॲसिडोसिसचा धोका वाढल्याचे सूचित करते. काही प्रकरणांमध्ये, विशेषतः तीव्र ॲसिडोसिससाठी, रक्त आणि मूत्र चाचण्या बायकार्बोनेट किंवा लॅक्टेटच्या पातळीतील बदल निदानास मदत करू शकतात. ही निदान साधने एकत्रितपणे वापरल्यास, रुमिनल ॲसिडोसिसचे तीव्र आणि उप-तीव्र दोन्ही प्रकार ओळखण्यास आणि त्यावर उपचार करण्यासाठी करण्यास मदत होते. विशेषतः रुमेनोसेन्टेसिससारख्या प्रक्रिया या अचूक असल्या, तरी त्यासाठी पशुवैद्यकीय कौशल्याची आवश्यकता असते आणि त्या लहान फार्म मर्यादित असतात.

आहारातील बदल : ॲसिडोसीससाठी मुख्यत्वे चारा आणि खाद्यातील तंतुमय घटकांचा आहारात योग्य समावेश करणे आवश्यक आहे, कारण चांगले तंतुमय घटक तोंडात चघळण्यास आणि लाळ उत्पादनास मदत करतात, लाळेतील घटक नैसर्गिकरीत्या किण्वन पोटातील आम्ल कमी करतात. आहारात चाऱ्यातील एनडीएफचे प्रमाण १७-२३ टक्क्यांच्या दरम्यान राखले पाहिजे, आणि पुरेसे तंतुमय घटक देण्यासाठी करण्यासाठी चाऱ्याचे किमान ५० टक्के कण ८ मिमीच्या चाळणीवर टिकून राहिले पाहिजेत. अगदी बारीक कुट्टी करू

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५२९ : घाघरा येथील युद्धात मुघल सम्राट बाबर यांनी बंगाल आणि बिहारच्या शासकांचा पराभव केला.
१५३६ : इंग्लंडचे राजा हेनरी अष्टम यांनी प्रत्येक गीरीजाघरात बाईबल हे धार्मिक पुस्तक ठेवण्यास सांगितले.
१५४२ : सेंट फ्रान्सिस झेव्हिअर तत्कालीन पोर्तुगीज गोव्याची राजधानी ओल्ड गोवा येथे पोहोचला.
१६३२ : शहाजहान बादशहा व आदिलशहा यांच्यामधे शहाजीला पराभूत करण्याबद्दल तह झाला.
१८१८ : वैशाख शु. १ शके १७४० राजधानी रायगड लढवत असताना शेवटच्या बाजीरावाची पत्नी वाराणशीबाई इंग्रजांकडून पराभूत झाली.
१८३५ : अमेरिकन वर्तमानपत्र न्यूयॉर्क हेरॉल्ड चे प्रकाशण करण्यास सुरुवात झाली.
१८४० : एक पेनी किमतीचे 'पेनी ब्लॅक' नावाचे जगातील पहिले टपाल तिकीट इंग्लंडमध्ये विक्रीसाठी खुले झाले. हे तिकीट १ मे १८४० रोजी जारी झाले होते.
१८८९ : पॅरिसमधील 'आयफेल टॉवर'चे उद्घाटन झाले.
१९१० : ब्रिटीश शासक एडवर्ड सप्तम यांच्या निधनानंतर त्यांची गाद्दी त्यांचे पुत्र जॉर्ज पंचम यांनी सांभाळली.
१९४४ : पुणे येथील आगा खान पॅलेस मधून महात्मा गांधी यांची सुटका झाली.
१९४९ : ईडीएसएसी पहिले इलेक्ट्रॉनिक डिजिटल संचलित संगणक सॉफ्टवेअर सुरु झाले.
१९५४ : रॉजर बॅनिस्टर हे १ मैल चार मिनिटांच्या आत धावणारे पाहिले व्यक्ती ठरले.
१९८३ : अडोल्फ हिटलर यांच्या डायरीचा लबाडी म्हणून खुलासा केला गेला.
१९९४ : इंग्लंडची राणी एलिझाबेथ (दुसरी) आणि फ्रान्सचे अध्यक्ष फ्रँकॉइस मित्राँ यांच्या हस्ते इंग्लिश खाडीखालुन जाणार्या आणि इंग्लंड व फ्रान्स यांना जोडणार्या 'युरो टनेल'चे उद्घाटन झाले.
१९९७ : 'बँक ऑफ इंग्लंड'ला स्वायत्तता देण्यात आली.
१९९९ : महाराष्ट्र राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांत महिलांना तीस टक्के आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला. अस निर्णय घेणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.
२००१ : पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी सिरीयातील एका मशिदीस भेट दिली. मशिदीस भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
२००२ : भूपिंदर नाथ किरपाल यांनी भारताचे ३१ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
२०१५ : सलमान खान यांना सदोष मनुष्यवधाच्या आरोपास दोषी ठरवून ५ वर्ष्याच्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच सलमान खान यांची हायकोर्टात अपील दाखल करून, जामिनावर सुटका.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५६ : सिग्मंड फ्रॉईड ऑस्ट्रियन मानसशास्त्रज्ञ, आधुनिक मानसशास्त्राचा जनक (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३९)
१८६१ : मोतीलाल गंगाधर नेहरू भारतीय स्वातंत्र्यसेनानी, स्वराज्य पक्षाचे संस्थापक सदस्य, कायदेपंडित (मृत्यू: ६ फेब्रुवारी १९३१)
१९२० : बुलो चंदीराम रामचंदानी ऊर्फ बुलो सी. रानी जुन्या पिढीतील संगीतकार व गायक (मृत्यू: २४ मे १९९३ मुंबई)
१९४० : प्रसिद्ध महिला तबलावादक, गायिका आणि संगीतज्ञ अबन मिस्त्री यांचा जन्म.
१९४३ : लेखिका वीणा चंद्रकांत गावाणकर यांचा जन्म.
१९५१ : लीला सॅमसन भरतनाट्यम नर्तिका, नृत्यदिग्दर्शिका आणि लेखिका. संगीत नाटक अकादमी आणि फिल्म सेन्सॉर बोर्डाच्या अध्यक्षा
१९५३ : टोनी ब्लेअर ब्रिटनचे पंतप्रधान आणि मजूर पक्षाचे अध्यक्ष
१९६४ : अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय जलतरणपटू खजान सिंह यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५८९ : रामतनू पांडे ऊर्फ मोहमाद आट्टा खान तथा संगीतसम्राट तानसेन अकबराच्या दरबारातील एक नवरत्न (जन्म: ? ? १५०६)
१८६२ : हेन्री थोरो अमेरिकन लेखक व विचारवंत (जन्म: १२ जुलै १८१७)
१९२२ : छत्रपती शाहू महाराज सामाजिक सुधारणांचे कृतीशील पुरस्कर्ते, कला, नाटक, संगीत यांचे प्रोत्साहक (जन्म: २६ जून १८७४)
१९४६ : भुलाभाई देसाई स्वातंत्र्यसेनानी व कायदेपंडित, त्यांनी होमरुल चळवळीतील कार्यकर्ते, १९३१ मधे 'गांधी-आयर्विन' कराराप्रमाणे त्यांनी बार्डोलीच्या शेतकऱ्यांची बाजू मांडली. १९३२ मध्ये कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतल्याबद्दल त्यांना एक वर्षाचा कारावास व दहा हजार रुपये दंड अशी शिक्षा झाली होती. (जन्म: १३ आक्टोबर १८७७)
१९५२ : मारिया मॉंटेसरी इटालियन डॉक्टर व शिक्षणतज्ञ. पूर्वप्राथमिक शिक्षणाविषयीच्या त्यांच्या उपक्रमामुळे तशा शाळा 'मॉंटेसरी' या नावाने ओळखल्या जातात. (जन्म: ३१ ऑगस्ट १८७०)
१९६६ : रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे भारतातील पहिले सिनिअर रँग्लर, फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू, मुंबई राज्याचे शिक्षणमंत्री, भारताचे ऑस्ट्रेलियातील उच्चायुक्त (जन्म: १६ फेब्रुवारी १८७६)
१९९५ : आचार्य गोविंदराव गोसावी प्रवचनकार, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, हैदराबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिक (जन्म:)
१९९९ : कृष्णाजी शंकर हिंगवे पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल व संस्थापक सदस्य (जन्म:)
२००१ : विख्यात मराठी कादंबरीकार, लेखिका मालतीबाई बेडेकर यांचे पुणे येथे निधन.
२००६ : जगातील सर्वात मोठे प्रवासी जहाज टायटनिक च्या दुर्घटनेचे साक्षीदार अमेरिकन नागरिक लिलियन एस्प्लंट यांचे निधन.

# कृषी महोत्सवात शासनाचा स्टॉल रामभरोसे

## अधिकारी-कर्मचाऱ्यांची दांडी, शेतकऱ्यांची गैरसोय

बीड । प्रतिनिधी

येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलावर सध्या 'किसान कृषी महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाभरातील शेतकरी नवनवीन तंत्रज्ञान आणि शासकीय योजनांची माहिती घेण्यासाठी या महोत्सवाला भेट देत आहेत. मात्र, या महोत्सवात शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी लावण्यात आलेला शासकीय कृषी विभागाचा स्टॉल चक्क ओसाड पडल्याचे पाहायला मिळत आहे. स्टॉलवर एकही कर्मचारी नसल्याने बीड कृषी विभागाची मोठी उदासीनता चव्हाट्यावर आली आहे.

शेतकऱ्यांच्या बाबतीमध्ये शासनाचीच उदासीनता मोठ्या प्रमाणात दिसत आहेत त्यात शासनाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन पिकावरील नियंत्रण कोणते पीक कधी घ्यावे यासाठीचे मार्गदर्शन होणे गरजेचे आहे मात्र कृषी विभागच उदासीन असल्याचे यातून स्पष्टपणे दिसत आहे बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुल नाव किसान कृषी महोत्सव गेवराई येथील संस्थेने आयोजित केला आहे या महोत्सवामध्ये राज्यभरातून कृषी वर आधारित प्रक्रिया करणारे उद्योग खाद्य संस्कृती शेतीमालावरील



प्रक्रिया उद्योग असे अनेक स्टॉल लागलेले आहेत याच महोत्सवामध्ये बीड जिल्हा कृषी विभागाअंतर्गत एक स्टॉल देखील उभा आहे मात्र केवळ या स्टॉलवर फलक लावण्यापुरतेच काम कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे एकीकडे कृषी विभागाने शेतकरी हा आपला आत्मा आहे असे म्हणायचे आणि दुसरीकडे शेतकऱ्यांनाच वाऱ्यावर सोडायचे ही स्थिती आज या कृषी महोत्सवामध्ये दिसून आली एकतर कृषी विभाग अशा महोत्सवाचे आयोजन करत नाही एखाद्या संस्थेने आयोजन केले असेल तर त्याला मदत करण्याचे धाडस देखील या कृषी विभागाला नसते यापूर्वी कृषी महोत्सवावर कृषी विभाग काही प्रमाणात अनुदान देत होता मात्र २०२२ नंतर हे अनुदान देखील बंद केले आहे तेव्हा शेतकरी नवीन तंत्रज्ञान कुठून विकसित करणार हा देखील मोठा प्रश्न आहे प्रामुख्याने कृषी विभागात शेतकऱ्यांच्या बाबतीत असा उदासीन असेल तर शेतकऱ्यांनी नेमके पाहिजे कुणाकडे हा मोठा प्रश्न आहे मागील काळामध्ये कृषी विभागाने आयोजित केलेल्या कृषी महोत्सवावर करोडो रुपयाचा खर्च केला मात्र त्याचा लाभ झाला नाही तेव्हा काही सामाजिक संस्था शेतकऱ्यांच्या बाबतीमध्ये पुढे येत असतील तर प्रोत्साहन देण्याचे काम राज्याच्या कृषी विभागाचे आहे प्रोत्साहन सोडा साधे कर्मचारी देखील स्कॉलर उपलब्ध नाहीत मग हा कृषी विभाग फक्त नावालाच आहे की काय असा प्रश्न महोत्सवामध्ये आलेल्या शेतकऱ्यांना पडला आहे या प्रकारामुळे कृषी विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, वरिष्ठ अधिकारी याकडे लक्ष देऊन संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त

एकीकडे सरकार 'शेतकरी राजा' च्या हितासाठी विविध उपक्रम राबवत असल्याचा दावा करत असताना, दुसरीकडे प्रत्यक्ष महोत्सवात शेतकऱ्यांना माहिती देण्यासाठी कर्मचारी उपलब्ध नसणे, हे दुर्दैवी असल्याची भावना शेतकरी व्यक्त करत आहेत. लांबून आलेल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळत नसल्याने त्यांना आल्यापावली माघारी फिरावे लागत आहे.

### प्रशासकीय उदासीनतेचे दर्शन

प्रकल्प संचालक (आत्मा) आणि तालुका कृषी अधिकारी कार्यालय, बीड यांच्या अंतर्गत हा स्टॉल लावण्यात आला आहे. मात्र, कर्मचारी नसल्याने या स्टॉलचे नियोजन केवळ नावापुरतेच उरले आहे का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.नसल्याने त्यांना आल्यापावली माघारी फिरावे लागत आहे.

''आम्ही योजनेची माहिती घेण्यासाठी इथे आलो होतो, पण इथे विचारण्यासाठी कोणी अधिकारी किंवा कर्मचारीच नाही. मग हा स्टॉल फक्त देखाव्यासाठी लावला आहे का?''

महोत्सवाला भेट देणारा संतप्त शेतकरी.

### योजना फलकावरच, माहिती देणारे गायब

कृषी विभागाच्या या स्टॉलवर 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना', 'महाडीबीटी' अंतर्गत मिळणारे कृषी यांत्रिकीकरण, सिंचन साधने आणि 'महाविस्तार ' यांसारख्या महत्त्वाच्या योजनांचे मोठे फलक लावण्यात आले आहेत. शासनाच्या विविध सवलतींची माहिती घेण्यासाठी शेतकरी या स्टॉलकडे आशेने जात आहेत, मात्र तिथे रिकाम्या खुर्च्यांशिवाय काहीही पाहायला मिळत नाहीये.

# अंगावर हळद लागण्यापूर्वीच भावी नवरदेवाची आत्महत्या

## सेनगाव तालुक्यातील वाघजाळी गावावर शोककळा

हिंगोली । प्रतिनिधी

सेनगाव तालुक्यातील वाघजाळी येथे अंगावर हळद लागण्यापुर्वीच भावी नवरदेवाची राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी ता. ५ सकाळी उघडकीस आली आहे. या घटनेमुळे गावावर शोककळा पसरली आहे. तर एकुलता एक मुलगा गेल्याने गांधीले कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आत्महत्येचे कारण अस्पष्ट असल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सेनगाव तालुक्यातील वाघजाळी येथील आनंद हरिभाऊ गांधीले (२२) हे कुटुंबियांसह राहतात. घरी आई, वडिल असा परिवार असून त्यांचा शेतीवरच उदरनिर्वाह चालतो. आनंद हेच शेती करतात. काही दिवसांपुर्वीच आनंद यांचा विवाह हिंगोली तालुक्यातील खांबाळा येथे ठरला होता. लग्न सोहळ्यापुर्वी गावालगत असलेल्या शेतात त्यांच्या घराचे बांधकाम देखील केले जात होते. त्यामुळे आनंद हे दररोज शेतात जाऊन घराच्या कामाकडे लक्ष देत होते. या शिवाय घरी लग्न सोहळा असल्याने लग्नाचीही धामधुम सुरु होती.

दरम्यान, नेहमी प्रमाणे आनंद हे सोमवारी ता. ४ रात्री आठ वाजण्याच्या सुमारास शेतातील घरी गेले होते. आज सकाळी आठ वाजेपर्यंत ते घरी परतले नसल्याने त्यांच्या कुटुंबियांनी शेतात जाऊन पाहणी केली असता आनंद यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर गावकऱ्यांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली होती. त्यानंतर गोरेगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद झळके, उपनिरीक्षक नितेश लेनगुळे, जमादार अनिल भारती यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मयत आनंद यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सेनगाव येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, मयत आनंद यांचा गुरुवारी ता. ७ रोजी त्यांचा विवाह सोहळा असल्याने आज सकाळी त्यांना नेण्यासाठी वधुकडील मंडळी येणार होती. मात्र अंगावर हळद लागण्यापुर्वीच आनंदने गळफास घेऊन जिवनयात्रा संपवली. या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे. मयत आनंद यांच्या आत्महत्येचे नेमके कारण स्पष्ट झाले नाही.

# विठ्ठलाचे नामस्मरण, चिंतन, प्रेमभावातूनच भक्ताला सापडतो आत्मसाक्षात्काराचा मार्ग

## वरूड बु. येथील कार्यक्रमात राम महाराज गाडेकर यांचे प्रतिपादन

वरुड । प्रतिनिधी

भक्ती ही केवळ शब्दांपुरती मर्यादित नसून ती मन, शरीर, आत्म्याच्या पूर्ण समर्पणातून साध्य होते. विठ्ठलाचे नामस्मरण, त्याच्या रूपाचे चिंतन, अखंड प्रेमभाव यामधूनच भक्ताला आत्मसाक्षात्काराचा मार्ग सापडतो. एकाग्रतेने भक्ती केल्यास परमेश्वराची प्राप्ती होते, असा संदेश राम महाराज गाडेकर यांनी आपल्या कीर्तनातून दिला. जाफराबाद तालुक्यातील वरुड बु. येथे आयोजित कीर्तनप्रसंगी ते बोलत होते.कीर्तनादरम्यान त्यांनी संत तुकाराम महाराज यांच्या 'बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल, करावा विठ्ठल जिवेभावे' या अभंगावर निरुपण केले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, जेव्हा मन पूर्णपणे विठ्ठलमय होते, तेव्हा काम, क्रोध, लोभ यासारखे विकार आपोआप नाहीसे होतात. 'तुका म्हणे देह भरिला विठ्ठल..' या अभंगाच्या ओळींचा संदर्भ देत त्यांनी स्पष्ट केले की, खरी भक्ती माणसाला अंतर्बाह्य शुद्ध करते. ती जीवनातील सर्व बंधनांपासून मुक्त करते. अशा अवस्थेत भक्ताला परमेश्वराशी एकरूप होण्याचा अद्वितीय आनंद मिळतो. 'अशा माझा पाहा अनुभव' या अभंगावर भाष्य करताना त्यांनी भक्तीतील धैर्य, निष्ठा, सातत्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. देवाशी संवाद साधण्यासाठी मनाची प्रामाणिकता आवश्यक असते. त्याची अनुभूती घेण्यासाठीही तीच गरज असते.

भक्तीमध्ये खंड न पडता सातत्य राखल्यास देवही भक्ताच्या हाकेला प्रतिसाद देतो, असे त्यांनी सांगितले. या कीर्तन कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. या वेळी सुभाष इंगळे, लोखंडे महाराज, बरडे महाराज, सुरेश महाराज करडेल, रतन महाराज बरडे, मृदंगाचार्य शिवपाल महाराज वाघमारे, परसराम जजाळ महाराज तसेच वाघमारे परिवार व आप्तेष्ट उपस्थित होते. अनुभूती घेण्यासाठी मनाची प्रामाणिकता आवश्यक यावेळी गाडेकर महाराज म्हणाले, जेव्हा मन पूर्णपणे विठ्ठलमय होते, तेव्हा काम, क्रोध, लोभ यासारखे विकार आपोआप नाहीसे होतात. खरी भक्ती माणसाला अंतर्बाह्य शुद्ध करते. ती जीवनातील सर्व बंधनांपासून मुक्त करते. अशा अवस्थेत भक्ताला परमेश्वराशी एकरूप होण्याचा अद्वितीय आनंद मिळतो. याप्रसंगी त्यांनी भक्तीतील धैर्य, निष्ठा, सातत्य यांचे महत्त्व अधोरेखित केले. देवाशी संवाद साधण्यासाठी मनाची प्रामाणिकता आवश्यक असते. त्याची अनुभूती घेण्यासाठीही तीच गरज असते. भक्तीमध्ये खंड न पडता सातत्य राखल्यास देवही भक्ताच्या हाकेला प्रतिसाद देतो, असे त्यांनी या वेळी सांगितले.

# गॅससाठी ३५ किमीहून फेऱ्या:संभाजीनगरात तापमान ४०च्या पुढे असताना सिलिंडरसाठी रांगा

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगरमधील लोकांना पुन्हा गॅस टंचाईचा सामना करावा लागतोय. शहराचे तापमान तब्बल ४० अंशाच्या पुढे जात आहे. मात्र, अशा रणरणत्या उन्हात लोकांना दिवसभर गॅस सिलिंडरसाठी ताटकळत उभे राहावे लागत आहे. त्यामुळे त्यांनी संताप व्यक्त केलाय. सरकार आणि प्रशासनाने लवकरात लवकर गॅस पुरवठा सुरळित करावा. सिलिंडर घरपोच द्यावे, अशी मागणी होतेय.अमेरिका आणि इराण युद्धामुळे शहरात गॅस पुरवठा विस्कळीत झालाय. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि प्रशासनाने सारे काही आलबेल असल्याचे सांगितले. मात्र, अनेक लोकांना गेल्या दोन-दोन महिन्यांपासून सिलिंडरच मिळाले नाही. त्याचा त्रास त्यांना सहन करावा लागतोय. अनेकजण सिलिंडरसाठी तब्बल ३५ किलोमीटर दूरवरून येत आहेत. याबाबत आम्ही जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांच्याशी संपर्क झाला नाही.

छत्रपती संभाजीनगरमधील बीड बायपास



जवळच्या सातारा परिसरातील हायकोर्ट कॉलनीमध्ये अहिल्या एचपी गॅसचे वितरण होते. येथे रोज सकाळी नऊपासून ग्राहक सिलिंडरसाठी रांगा लावताना दिसत आहेत. अनेकांना फेब्रुवारीपासून सिलिंडर मिळाले नाही. त्यामुळे कामधंदा सोडून या रणरणत्या उन्हात त्यांना सिलिंडरसाठी रांगेत उभे रहावे लागत आहे. एक ग्राहक दिव्य मराठी डिजिटलशी बोलताना म्हणाले की, 'गेल्या दोन महिन्यांपासून गॅस सिलिंडरच्या टंचाईचा त्रास सुरू आहे. २८ फेब्रुवारी रोजी मला पहिला सिलिंडर मिळाला होता. त्यानंतर आज दोन महिने होत आले. मात्र, सिलिंडर मिळाला नाही. २७ एप्रिल रोजी माझा ओटीपी आला होता. तो त्यांनी १ तारखेला रद्द केला. काल पुन्हा दिवसभर रांगेत होतो. मात्र, गॅस मिळाला नाही. त्यानंतर मला पुन्हा ओटीपी घ्यावा लागला. आजसकाळी साडेनऊपासून रांगेत उभा आहे. दीडदोनशे ग्राहक माझ्यासोबत रांगेत आहेत.'

# छत्रपती संभाजीनगर शहरात लवकरच लिंक लाइन प्रकल्प

छत्रपती संभाजीनगर

शहरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येवर महावितरणने कायमस्वरूपी तोडगा शोधला आहे. शहरात लवकरच २६ कोटींचा लिंक लाइन प्रकल्प राबवण्यात येणार आहे. यामुळे संपूर्ण शहराचा वीजपुरवठा अधिक सक्षम आणि सुरक्षित होणार आहे. विशेष म्हणजे, या प्रकल्पामुळे शहरातील सर्व २८ सबस्टेशन्सना दुहेरी वीजपुरवठ्याचा स्रोत उपलब्ध होईल.शहरात ३३ केव्हीची २८ सबस्टेशन्स आहेत. सद्य:स्थितीत यातील १८ ठिकाणी दोन स्रोतांकडून वीज मिळते, मात्र १० सबस्टेशन्स केवळ एकाच वाहिनीवर अवलंबून आहेत. परिणामी, या वाहिन्यांमध्ये बिघाड झाल्यास संबंधित भागातील २० ते ३० हजार ग्राहकांना तासन्तास अंधारात राहावे लागते. लिंक लाइन प्रकल्पामुळे ही सर्व केंद्रे रिंग मेन सिस्टिमद्वारे एकमेकांना जोडली जातील.

प्रामुख्याने जाधववाडी, वाल्मी, समाधान कॉलनी, वाळूज (एम आणि ई सेक्टर), सिडको एन-७, एन-१० आणि बेडसे या भागांतील सबस्टेशन्स आता डबल सोर्सने जोडली जाणार आहेत. ''लिंक लाइन प्रकल्पाचा डीपीआर मंजुरीसाठी मुख्यालयाकडे पाठवला आहे.

# जालन्यात हरियालच्या प्रतिमेची विटंबना

## तरुणावर गुन्हा दाखल, व्हायरल झालेल्या व्हिडिओतून प्रकार उघडकीस

जालना । प्रतिनिधी

शहराच्या सौंदर्यात भर टाकण्यासाठी मोतीबाग तलाव (चौपाटी) परिसरात बसवण्यात आलेल्या राज्यपक्षी हरियालच्या प्रतिमेचे नुकसान केल्याचा प्रकार सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओतून उघडकीस आला. एका अज्ञात तरुणाने केवळ व्हिडिओ करून प्रसिद्धी मिळवण्यासाठी या प्रतिमेची मोडतोड केल्याप्रकरणी चंदनझिरा पोलिस ठाण्यात सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला.

मनपात १० वर्षांपासून सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या आरेफ बेग वहीद बेग यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. जालना महानगरपालिकेच्या वतीने मोतीबाग तलाव परिसरात सुशोभीकरणाअंतर्गत भव्य राज्यपक्षी हरियालची प्रतिमा तयार करण्यात आली आहे. मात्र, १ ते ४ मे रोजी सकाळी १० वाजेदरम्यान २० ते २५ वर्षे वयोगटातील एका अज्ञात तरुणाने या प्रतिमेवर चढून नुकसान केले. संबंधित तरुणाने या कृत्याचा व्हिडिओ केला. तो सोशल मीडियावर व्हायरल केला. ही बाब निदर्शनास आल्यानंतर आरेफ बेग व त्यांचे सहकारी मुकेश ससाणे यांनी प्रत्यक्ष स्थळाची पाहणी केली. त्यात राज्यपक्षी हरियालच्या प्रतिमेचा मूळ ढाचा व रंग यांचे जाणीवपूर्वक नुकसान केल्याचे दिसून आले. तपास पोलिस निरीक्षक बाळासाहेब नारायण यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल मनसुख वेताळ करत आहेत. पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते जालना शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या नवीन चौपाटीचे लोकार्पण करण्यात आले. येथील राज्यपक्षी हरियालची लक्षवेधी प्रतिमा सर्वांनाच आकर्षित करत आहे. शहरासह बाहेरगावाहून ये-जा करणारे प्रवासी व पर्यटक कॅमेऱ्यातून हे चित्र टिपत आहेत. मात्र, याच ठिकाणी असलेल्या हरियालच्या प्रतिमेचे अज्ञाताने नुकसान केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

# साधना सप्ताहातील उल्लेखनीय कामगिरी

## हिंगोलीच्या मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांचा शुक्रवारी मुंबईत होणार गौरव

हिंगोली । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या मिशन कर्मयोगी उपक्रमांतर्गत साधना सप्ताहामध्ये हिंगोली जिल्हा परिषद अंतर्गत ९५ टक्के कर्मचाऱ्यांनी विविध प्रशिक्षणे पूर्ण करून राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. यासप्ताहातील उत्कृष्ठ कामगिरी बद्दल जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांना पुरस्कार जाहिर झाला असून शुक्रवारी ता. ८ मुंबई येथे टेक वारी या कार्यक्रमात पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.केंद्र सरकारने मिशन कर्मयोगी उपक्रम देशभरात हाती घेतला आहे. या उपक्रमांमध्ये विविध प्रशिक्षण, अभ्यासक्रमासह इतर उपक्रम जिल्हा परिषद व इतर शासकिय कार्यालयांनी राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. या अभियानांतर्गत केंद्राच्या सूचने नुसार ता. २ ते ता. ८ एप्रील या कालावधीत साधना सप्ताह राबविण्यात आला. या सप्ताहात जिल्हा परिषद अंतर्गत कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करून एआय च्या प्रशिक्षणासोबतच इतर चार तासाचे प्रशिक्षण पूर्ण करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्यानुसार हिंगोली जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्यकार्यकारी अधिकारी समृध्दी दिवाने, केशव गड्डापोड, विजय बोराटे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर माडे, जलसंधारण विभागाच्या कार्यकारी अभियंता प्रियंका राजपूत, समाज कल्याण अधिकारी गिता गुठ्ठे, शिक्षणाधिकारी आसावरी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वच विभागांमधून सुमारे ५०९८ कर्मचाऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. त्यापैकी ५०२२ कर्मचाऱ्यांनी कोर्सस पूर्ण केले. तर ४७२२ कर्मचाऱ्यांनी चारतासाचा कोर्स पूर्ण केला आहे. त्यामुळे राज्यात इतर जिल्हयांच्या तुलनेत हिंगोली जिल्हा परिषदेच्या ९५ टक्के कर्मचाऱ्यांनी कोर्सस पूर्ण करून राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे. या प्रशिक्षणामुळे कर्मचाऱ्यांच्या कामकाजात सुधारणा येणार असून कामात गतीमानता व अचुक कामे होतील. त्यामुळे प्रशासन गतीमान होऊन नागरीकांची कामे जलदगतीने होण्यात मदत झाली आहे. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या उत्कृष्ठ कामगिरीबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांना शासनाच्या सामान्य प्रशासनाच्या वतीने पुरस्कार जाहिर झाला आहे. मुंबई येथे शुक्रवारी ता. ८ दुपारी तीन वाजता मंत्रालयाच्या मुख्य इमारतीच्या त्रिमुर्ती प्रांगण येथे मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे पत्र अप्पर मुख्य सचिव व्ही.राधा यांनी पाठविले आहे.

# तीर्थपुरीत चोरट्यांनी दोन घरे फोडली

## सव्वातीन लाखांचा मुद्देमाल पळवला

तीर्थपुरी । प्रतिनिधी

तीर्थपुरी शहरातील माळी गल्लीत घराला कुलूप असल्याची संधी साधून सोमवारी पहाटे चोरट्यांनी दोन ठिकाणी घरफोडी केली. यात तीन लाख रुपयांचा ऐवज लुटून नेला आहे.

तीर्थपुरी शहरातील माळी गल्लीत राहणारे राम राधाकिसन वाजे यांनी घराला कुलूप लावले होते. ते नातेवाईकांच्या लग्नासाठी सहकुटुंब परगावी गेले होते. त्यांच्या घराजवळच राहणारे मोतीराम राईन्द्रे हेही काही कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. घरी कोणी नसल्याची संधी साधून



चोरट्यांनी सोमवारी पहाटे दोन्ही घरांचे कुलूप तोडले. त्यांनी घरफोडी केली. यात मोतीराम राईन्द्रे यांच्या घरामधून पाच ग्रॅम वजनाचा झुंबरजोड, सोन्याची एकदाणी आठ ग्रॅम, नाकातील दोन नथी तीन ग्रॅम, सोन्याचे मणी असलेली पोत पाच ग्रॅम, चांदीची चैन बारा भार वजनाची असा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. एकूण सोन्याचे २१ ग्रॅम व चांदी बारा भार असा मुद्देमाल चोरीला गेला. राम राधाकिसन वाजे यांच्या कपाटामधून रोख २५ हजार रुपये व एक ग्रॅम सोन्याची नथ लंपास करण्यात आली. दोन्ही घरांतून मिळून अंदाजे सव्वातीन लाख रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. दरम्यान, तीर्थपुरी पोलिस स्टेशनच्या सहायक पोलिस निरीक्षक वैशाली पवार यांनी फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली.याप्रकरणी मोतीराम राईन्द्रे यांच्या फिर्यादीवरून पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक प्रतिभा पठाडे करीत आहेत.

# नसरापूरच्या नरकासूराचा वधच करा !

**बीड । प्रतिनिधी**

**काल दि.०५ मे रोजी पुणे जिल्ह्यातील नसरापूर येथे घडलेल्या अत्यंत संतापजनक घटनेच्या निषेधार्थ भिमा कांबळे या आरोपीला तात्काळ मृत्यूदंडाची शिक्षा द्यावी या मागणीसाठी बीड येथील युवकांनी एकत्र येत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले.**

सदरील आरोपीची पार्श्वभूमी ही अशाच प्रकारच्या गुन्हेगारी स्वरुपाची असताना या नराधमाला २ वेळा मिळालेली सूट हे न्यायव्यवस्थेचे अपयश आहे. अशा निच विकृतींना जागेवर मृत्यूदंडाची शिक्षा होण्यासाठी कायद्यात सुधारणा होणे नितांत आवश्यक आहे. या मागणीसाठी काल बीड शहरातील सर्वधर्मीय लोकांनी एकत्र येत सरकारला जाब विचारत सरकारच्या निष्क्रियतेवर प्रश्न उपस्थित केला.





## संतप्त जमावाची शासनाकडे अग्रही मागणी

जिल्हाधिकारी महोदयांना देण्यात आलेल्या निवेदनात महत्वाच्या खालील मागण्याचा समावेश आहे;

१) महाराष्ट्र विधिमंडळात संमत झालेला पण केंद्र शासनाने पारित करण्यास बाकी असणारा शक्ती कायद्याची तात्काळ अंमलबजावणी केली जावी, ज्या अन्वये लैंगिक अत्याचार करणाऱ्या हैवानांना जलद गतीने शिक्षा दिली जावू शकेल. २) अत्याचारग्रस्त कुटुंबीयांना सक्षम आर्थिक मदत आणि संरक्षण देण्यात यावे. ३) पिडीतेच्या कुटुंबाला या नाजूक काळात आधार देण्यासाठी शासनाची प्रतिनिधी म्हणून प्रत्यक्ष उपस्थित राहणे अपेक्षित असताना संबंधीत जिल्ह्याचे जिल्हाधिकारी याबाबत उदासीन व बेजबाबदारपणा दर्शवतात. याचा ठपका ठेवून त्यांना व जिल्हा बाल संरक्षणाधिकारीला तात्काळ निलंबित करण्यात यावे. ४) अशा प्रकारचे गुन्हे करण्याची पुन्हा कोणाचीही हिंमत होऊ नये म्हणून संबंधित गुन्हेगाराला जाहीर ठिकाणी सर्वांसमक्ष फाशी देण्यात यावे.

या उद्विग्न भावनेने झालेल्या आंदोलनाची रुपरेषा नगरसेवक महेश धांडे, डॉ.अजिंक्य पांडव, प्रा.अभय पटवारी, प्रा.नितेश अग्रवाल, उद्योजक सार्थक भणगे, ॲड. अक्षय भालेराव, शुभम जोशी, भालचंद्र कुलकर्णी, स्वप्नील देशमुख यांनी आखली होती.

सदर निवेदन देण्यासाठी विविध पक्षीय, विविध धर्मीय संवेदनशील नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. ज्यामध्ये प्रामुख्याने आ.संदीप क्षीरसागर, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, भाजपा नेते सर्जेराव तांदळे, सामाजिक कार्यकर्ते परशुराम गुरखुदे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, प्रा.चंद्रकांत मुळे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, गटनेते फारूक पटेल, संपादक शेख मुजीब, डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, किशोर पिंगळे,ज्येष्ठ पत्रकार महेश वाघमारे,श्री.सागर देशपांडे ॲड.प्रज्ञाताई खोसरे, ॲड.मनीषाताई कुपकर, ॲड.संगीताताई धसे, ॲड.दीपक कुलकर्णी, नंदिनी ओवाळ, सौ.रोहिणीताई बाभुळगावकर, सौ.कविता देशमुख, सौ.मीरा वैद्य, श्री.विजयेंद्र चौधरी,पत्रकार प्रशांत सुलाखे, दिनेश लिंबेकर, गोरख शिंदे,संभाजी सुर्वे, ऍड.कीर्ती कुलकर्णी,ऍड. सारिका जोशी हे उपस्थित होते.

## बीड स्थानिक गुन्हे शाखेकडून आंतरजिल्हा वाहन चोरट्यांच्या टोळीचा पर्दाफाश; दोन आरोपी जेरबंद

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यासह शेजारील जिल्ह्यातून चारचाकी वाहने चोरणाऱ्या टोळीला जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली असून त्यांच्याकडून चोरीचा माल जप्त करण्यात आला आहे.



दिनांक १० एप्रिल २०२६ रोजी पेठबीड येथील रहिवासी अश्पाक अनिमोद्दीन मोमीन यांचा अशोक लिलँड कंपनीचा टेम्पो बार्शी नाका परिसरातून अज्ञात चोरट्यांनी पळवून नेला होता. याप्रकरणी पेठबीड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करत असताना, गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार आरोपी लातूर येथील असल्याची खात्री पटली. पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने लातूरमध्ये सापळा रचून खालील दोन आरोपींना शिताफीने ताब्यात घेतले: १) तैबाज सलीम शेख (वय २५ वर्षे, रा. म्हाडा कॉलनी, लातूर) पान ३ वर

## वडवणीतील अतिक्रमणावर हातोडा

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील गट नं. २१५ मधील सेवा सहकारी सोसायटीची जागा होती.इ स १९९० साली ती ५० वर्षाच्या करारावर सौ जिवनकला पारसमल नहार यांनी ताब्यात घेतली होती.परंतु तो करार अनाधी कृत आसल्याचे निष्पण झाल्याने तिन मजली बांधकाम मंगळवार दि ५ रोजी पाडण्यात आले आहे.



शहरातील पुर्वी चा जुना मोंढा परीसरातील सेवा सहकारी सोसायटी लि वडवणी यांची ४३ ९० ऐवढी जागा आहे.त्यात १७ ३५ वर डॉ पारसमल नहार यांच्या पत्नी सौ जिवनकला नहार यांनी ५० वर्षाच्या करारावर जागा ताब्यात घेतली होती, त्यात तिन मजली बांधकाम केले होते.त्यात सध्य स्थीतीत डॉ पारसमल नहार यांचा दवाखाना व राहाते घर होते.सन २०२२ मध्ये सेवा सहकारी सोसायटी च्या निवडुन आलेल्या सर्व संचलकांनी घेण्यात आलेल्या ठरावात अनाधिकृत केलेल्या तिन मजली बांधकामावर आक्षेप घेतला होता. यात डॉ पारसमल नहार यांचा दवाखाना व राहाते घर सेवा सहकारी सोसायटी ली वडवणी ते खाली करण्याच्या नोटीसी द्वारे सुचना दिली होती.यासाठी जीवन कला पारसमल नहार यांनी कोर्टातही दाद मागीतली होती परंतु काही कारणास्तव पान ३ वर

## पुरुष कर्मचाऱ्यांनी मुंडण केले; आता महिला कर्मचारी करणार ‘मुंडण’

### समग्र शिक्षा, मुंबईत आंदोलनाचा ५७ दिवस

बीड । प्रतिनिधी

प्रगतीशील महाराष्ट्रात महिला पहिल्यांदाच मुंडण करणार करणार असून ही स्थिती राज्यसरकारने शिक्षण विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांवर आणली आहे. ९ मार्च २०२६ पासून राज्यातील समग्र शिक्षा अभियानाचे तीन हजाराचे वर कंत्राटी कर्मचारी आंदोलन करत असून यापूर्वी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी २० एप्रिल रोजी पुरुषांनी मुंडण आंदोलन केले आहे. आंदोलनाला बसलेल्या कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर सरकार आंदोलनकर्त्यांची दखल घेणार का? असा प्रश्न मुंबईत आझाद मैदानावर आंदोलनाला बसलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी विचारला आहे.

देशात लाडक्या बहिणी व महिला आरक्षणाचा मुद्दा चर्चेत असताना प्रगतीशील महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना आपल्या रास्त मागण्यासाठी ५६ दिवस उपोषण व इतर आंदोलन करावे लागत आहे. उन्हाच्या तडाख्यात ५६ दिवसाच्या आंदोलनानंतर सुद्धा एकाही मंत्र्याने दखल घेतली नसल्याने नाईलाजाने कर्मचाऱ्यांनी महिला मुंडण आंदोलनाचा इशारा दिला आहे. ७ तारखेपर्यंत सरकारने नियमित करण्यासंदर्भात ठोस निर्णय न घेतल्यास ८ मे रोजी समग्र शिक्षा अभियान अंतर्गत महिला कर्मचारी कर्मचारी मुंडण करणार असल्याचे निवेदन शासनास सादर केले आहे.

मागील २० ते २५ वर्षापासून शासन सेवेत कायमच्या प्रतीक्षेत असलेले समग्र शिक्षा अभियानाचे तीन हजारांवर कर्मचारी पान ३ वर

## पाटोदा प्रशासनाचा ‘तुघलकी’कारभार मृतांच्या टाळूवरचे लोणी खाण्याचा प्रकार!

### ८ महिने उलटले,तरीही बळीराजा मदतीच्या प्रतीक्षेत;शेतकरी नेते गणेश कवडे यांचा ‘बोंबाबोंब’आंदोलनाचा इशारा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहर आणि परिसरात अतिवृष्टी होऊन निसर्गाने घाला घातल्याला आता आठ महिने उलटले आहेत.मात्र,या संकटात आधार द्यायचे सोडून पाटोदा प्रशासन आपल्या ’विचित्र’ आणि’अजब’ नियमांनी जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहे.वारंवार होणारे पंचनामे आणि प्रशासकीय अनास्थेमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांच्या वतीने आता शेतकरी नेते गणेश कवडे यांनी प्रशासनाला थेट चपराक लगावत आरपारच्या लढाईचे रणशिंग फुंकले आहे.कागदी घोडे की केवळ सोपस्कार?अतिवृष्टीमुळे पाटोदा शहरातील शभरा हून अधिक घरांची पडझड झाली त्यातील काही ठराविक लोकांना तुटपुंजी मदत देऊन पाणे पुसण्याचे काम सरकारने केल आहे.महसूल विभागाने अतिशय तत्परता दाखवत एकाच घराचे दोन-दोन,तीन-तीन वेळा पंचनामे केले.मात्र,प्रत्यक्ष मदत वाटपाची वेळ आली तेव्हा निधी उपलब्ध नाही हे पालुपद लावून प्रशासनाने आपली जबाबदारी झटकली आहे.प्रशासनाला जर मदतच द्यायची नव्हती,तर मग पंचनाम्यांच्या नावाने गरिबांच्या उंबरठ्यावर फेऱ्या मारून त्यांच्या आशा का पल्लवित केल्या?असा संतप्त सवाल गणेश कवडे यांनी उपस्थित केला आहे.पुरात वाहून गेलेल्या जनावरांची ’हाडे’आता शोधायची कशी?प्रशासकीय क्रूरतेचा कळस म्हणजे जनावरांच्या नुकसानीबाबत काढलेला आदेश!सप्टेंबर महिन्यात आलेल्या पुरात जनावरे वाहून गेली,त्याचे पंचनामे झाले.पण आता एप्रिल महिन्यात प्रशासन ’जनावरांच्या हाडांचा शोध’ घेण्याचे फर्मान काढत आहेत. आठ महिन्यांनंतर वाहून गेलेल्या जनावरांचे अवशेष कुठे मिळणार?वास्तव हा केवळ वेळकाढूपणा असून शेतकऱ्यांची केलेली ही क्रूर थट्टा आहे.विहिरींचा निधी ’नगर पंचायत’ विरुद्ध’ग्राम पंचायत’वादात अडकला!अनेक शेतकऱ्यांच्या विहिरी गाळाने भरल्या असून शेतीचा आधार पूर्णपणे कोलमडला आहे.’रोहयो’ अंतर्गत मदत मिळणे अपेक्षित असताना,तांत्रिक मुद्द्यांचे कारण पुढे करून फाईल्स अडवून धरल्या आहेत.नियोजन विभागाचे स्पष्ट पान ३ वर

## अंबाजोगाईत जनप्रबोधनपर भीमगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन –राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारतीय घटनेचे शिल्पकार परमपूज्य बोधिसत्व बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त त्यांनी सांगितलेल्या मौलिक विचारांचे मूल्यांचे प्रकटीकरण करणारा जनप्रबोधनपर क्रांतिकारी भीमगीतांचा जलसा अंबाजोगाई येथे साठेनगर, परळी वेस येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती इंडियन मेडिकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष तथा माजी शिक्षण सभापती डॉ.राजेश



इंगोले व न्यूज लोकमनचे संपादक संजय जोगदंड यांनी यावेळी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

सदरील कार्यक्रम बुधवार, दिनांक ६ मे २०२६ रोजी साठेनगर, मांडवा रोड, परळी वेस, अंबाजोगाई येथे संध्याकाळी ६.३० वाजता संपन्न होणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रबोधनाचे प्रभावी माध्यम म्हणून लोककला लोकगीते आणि कलाकारांद्वारे प्रदर्शित करण्यात येणारी कला यांना सन्मान दिला होता. व्याख्यात्याचे दोन तासांचे भाषण आणि कलाकाराचे पाच मिनिटांचे गाणे हे एकाच ताकदीचे असतात असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्या काळात म्हटले होते. अंबाजोगाई येथील स्थानिक कलाकारांचा हा ताफा भीमगीतांचा क्रांतिकारी जलसा आपल्यासमोर गाण्यांच्या स्वरूपात गाऊन दाखविणार आहेत. अंबाजोगाईतील अनेक कलाकार महाराष्ट्रातल्या विविध भागात जाऊन त्यांची कला सादर करीत असतात असा नांवलौकिक पान ३ वर

## महिला स्वत:च्या पायावर उभा राहिल्यासच अर्थिक सक्षमीकरण होईल – आशा भिसे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महिला जोपर्यंत स्वतःच्या पायावर उभा टाकणार नाही तोपर्यंत अर्थिक सक्षमीकरण होणार नाही घर



चालवताना खर्च करण्याचा निर्णय कमावणाऱ्या स्त्रीला जेव्हा प्राप्त होईल तेव्हा खऱ्या अर्थाने सक्षमीकरण झाले असे म्हणता येईल आणि हे सक्षमीकरण होणे काळाची गरज आहे असे मत सामाजिक कार्यकर्त्या तथा लातुर जिल्हा परिषदेच्या सदस्या आशाताई भिसे यांनी व्यक्त केले.

त्या योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी क्रिडा प्रबोधिनी, श्रीमती कमल खुरसाळे स्मृती न्यास, स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय, श्रीमती गो.कु.यो. कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिला आत्मभान प्रशिक्षण शिबीरातील व्याख्यानात त्या बोलत होत्या.

शिबीरार्थी विद्यार्थिनी समोर बोलताना आशा भिसे म्हणाल्या की, जेव्हा अर्थकारणात महिला येईल निर्णय प्रक्रियेत महिला येईल तेव्हाच महिला खऱ्या अर्थाने सक्षम होईल महिलांचा आहार ताकद हा सुद्धा सक्षमीकरणाचाच भाग आहे त्यामुळे संतुलित आहार घेऊन स्वतःची प्रकृती उत्तम ठेवून स्वतःचा सन्मान राखावा आणि स्वतः विविध चळवळीत अग्रेसर रहावे विशेष म्हणजे पान ३ वर

## माजी सैनिक भिमराव धांडे यांचे दु:खद निधन

मादळमोही । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तांदळा येथिल माजी सैनिक भिमराव धांडे यांचे मंगळवारी दुपारी ३ वाजता दिर्घ आजाराने निधन झाले देशसेवेत असताना त्यांचा अपघात झाल्याने निवृत झाले होते,शुगराच्या आजाराने ते अनेक वर्षापासून त्रस्त होते.



भिमराव सुर्यभान धांडे माजी सैनिक यांची दि,५ मे मंगळवारी रोजी दुपारी ३ वाजता त्यांची प्राणज्योत मावळली मुत्यू समय त्यांचे वय ७० वर्ष होते, शालेय जिवना पासुन देशसेवेसाठी त्यांनी झोकुन दिले होते काही वर्षांपासून शुगर असल्याने ते त्रस्त होते त्यांचा स्वभाव मनमोकळा होता, विद्यार्थ्यांना ते शिक्षणा विषय माहीती देवुन देशसेवेसाठी सैनिक झाल पाहीजे असे ते सांगत होते,अखेर मंगळवारी दुपारी त्यांची प्राणज्योत मावळली त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा दोन मुली नातवंडे असा परिवार आहे,तांदळा गांवात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## तिकाडे वस्ती पर्यंतचा रस्ता शेतकऱ्यांनी समन्वयातून वहिवाटिस खुला केला

शिरूर । प्रतिनिधी

हिवरसिगा सज्जा अतर्गत शिव हद्दीपासुन ते तिकाडे- शिंदे वस्ती पर्यंत चा पारपारिक व अनेकवर्षापासुन तुबलेला शेतरस्ता शेतकरी याच्या समाजस्य भूमिकेतून मा. सुरेशजी घोळवे (तहसीलदार शिरूर) मा. शहादेव सानप ( मडळाधिकारी) बाळासाहेब बागर ( ग्राममहसुल अधिकारी ) मा. विश्वाभर शिंदे ( उपसरपंच) मा. माऊली शिंदे ( ग्रामरस्ता समिती ) मा.शिवराम राऊत ( ग्रामरस्ता समिती)मा. रामेश्वर पाडुळे, याच्या प्रमुख उपस्तितीत अनेक वर्षापासून प्रलंबित आसणारा तुबलेला





शेतरस्ता खुला करण्यात आला. यावेळी दोन्ही बाजूच्या शेतकरी यानी मनाचे औदार्य दाखवत व ज्ञानोबा शिंदे याच्या न्याय सिमाकन करण्याच्या पद्धतीवर विश्वास ठेवत दोन्ही गटाच्या मध्यभागातून प्रत्येकी ६ फूट रुद जमीनी सोडून देत जायमोक्यावर गट क्र. १४०,१३९.१३८ मधील किमान १ कि. मी. लाब व १२ फूट रूदीचा शेतरस्ता प्रत्यक्ष वहिवाटीस खुला करण्यात आला. यावेळी तात्काळ मोजमाप करून सिमाकन करत प्रस्तावित शेतरस्त्याच्या हद्दी निश्चित करण्यात आल्या व उपस्थित शेतकऱ्यांना सदरील रस्ता खडिकरण- मजबुतीकरण करून देण्याची हमी श्री. विश्वाभर शिंदे ( उपसरपंच ) यानी दिली. यावेळी दोन्ही बाजूच्या शेतकऱ्यांत समन्वय घडवण्यासाठी शिवराम राऊत (अध्यक्ष शिवश्री कृषिमडळ) यानी अथक परिश्रम घेतले.

यावेळी हिवरसिगा शिवहद्दी पासुन तिकाडे शिंदे वस्ती पर्यंत चा खुला व हद्द निन्चित केलेला शेतरस्ता महसुल अभिलेखात इतर हक्कात नोद करून भूमी अभिलेख विभागाच्या गावनकाशात जोडण्यासाठी सर्वतो प्रयत्न व सहकार्य करण्याचे अश्वासन मा. तहसिदार महोदयानी शेतकऱ्यांना देण्यात आले.

## माऊली गुंजाळ यांची पोलिस उपनिरीक्षकपदी नियुक्ती; चकलांबा येथे सत्कार

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील भूमीपुत्र तथा अहिल्यानगर जिल्हा पोलिस दलात कार्यरत असलेले माऊली गुंजाळ यांना पोलिस दलात पोलिस उपनिरीक्षकपदी एमपीएससी’ द्वारे नियुक्ती झाली आहे. या नियुक्तीमुळे चकलांबा येथील ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. गुंजाळ यांचा विविध व्यक्ती आणि संस्थेच्या वतीने वयक्तिक व सार्वजनिक सत्कार करण्यात आला.



माऊली गुंजाळ यांनी कुशाग्र बुद्धिमत्ता, जिद्द, आणि मेहनत यामुळे माऊली गुंजाळ हे सन २०१४ साली अकोला जिल्हा पोलिस दलात भरती झाले. त्यानंतर अहिल्यानगर जिल्हा श्रीरामपूर शहर येथे आंतरजिल्हा बदलीने पदस्थापना झाली. श्रीरामपूर येथे कार्यरत असताना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या अंतर्गत परीक्षेतून पोलिस उपनिरीक्षकपदी नियुक्ती झाली आहे. पीएसआय पदी निवड झाल्यामुळे चकलांबा येथील विविध मान्यवरासह पोलिस उपनिरीक्षक पवन निंबाळकर, पोलिस बाळासाहेब खेडकर, माऊली खरे, आप्पासाहेब खेडकर, आदीसह मित्र परिवाराने माऊली गुंजाळ यांचा सत्कार केला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# एकरी २ कोटी रुपये, ७ मे पासून पैसे खात्यात, MIDC मध्ये नोकरी, पुरंदर विमानतळासाठी पैशांचा पाऊस

**पुणे । प्रतिनिधी**

प्रस्तावित पुरंदर विमानतळाच्या जमीन अधिग्रहणासाठी सरकारने तिजोरी उघडली आहे. प्रत्येक एकरामागे सरासरी दोन कोटी रुपये देण्यात येणार असल्याची घोषणा पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केली. तसेच या प्रकल्पात ज्यांच्या जमिनी गेल्या आहेत त्यांच्या कुटुंबातील एकाला विमानतळावर नोकरी देण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्याकडून घेण्यात आलेल्या जमिनीपैकी १० टक्के जमीन विकसित भूखंड शेतकऱ्याला परत केला जाणार असल्याची मोठी घोषणा जिल्हाधिकाऱ्यांनी केली.



जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले की, पुरंदर विमानतळ जमीन अधिग्रहण शेवटच्या टप्प्यात आलं आहे. पुरंदरमधील सात गावांमध्ये मिळून १,२१६ हेक्टर जमीन तर इतर २४२ एकर जमीन अधिग्रहित करण्यात येणार आहे. या गावांमधील शेतकऱ्यांना व्याजासहित एक एकरला १ कोटी ६१ लाख १ हजार ९२५ रुपये एवढा रेट मिळाला आहे.

ज्या शेतकऱ्याची फळबागाची जमीन असेल तर त्याला डबल रेट देण्यात येणार आहे. शेतात जर विहीर किंवा बोरवेल असेल तर त्याचीही किंमत ठरवण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला कमी जास्त करून सरासरी २ कोटी रुपये त्याच्या खात्यात देण्यात येतील असं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं. आपण शेतकऱ्यांकडून जेवढी जमीन घेतोय त्याच्या दहा १० जमीन विकसित भूखंड शेतकऱ्यांना परत देण्यात येणार असल्याची मोठी घोषणा जिल्हाधिकाऱ्यांनी केली. त्याचसोबत ज्या शेतकऱ्याचं घर जाणार आहे त्याच्या अतिरिक्त अडीच गुंठे जमीन घरासाठी दिली जाणार आहे. भूमीहिन शेतकऱ्यांना साडे सातशे दिवसांचे वेतन दिले जाणार आहे. तसेच प्रत्येक शेतकऱ्याच्या कुटुंबातील एकट्याला विमानतळावर नोकरी देण्यात येणार आहे. येत्या ७ मे पासून ही प्रक्रिया सुरू करण्यात येणार असून शेतकऱ्यांच्या त्यांच्या बँक खात्यात रक्कम पाठवण्यात येणार आहे. पुरंदर विमानतळाची टेंडर प्रक्रिया पूर्ण करून ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये कामाला सुरूवात करण्यात येणार आहे. पुरंदर विमानतळाचं काम येत्या तीन वर्षांत पूर्ण होण्याचा अंदाज असल्याचं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

.. तर सक्तीने भूसंपादन होणार, जिल्हाधिकाऱ्यांची माहिती

शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये किंवा सासवड प्रांत कार्यालयामध्ये करारनामा सादर करता येईल. शेतकऱ्यांनी सर्व कागदपत्रे घेऊन येणे आवश्यक आहे असं जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं. १० जून पर्यंत ही प्रक्रिया सुरू राहील. ज्याची सहमती असेल त्यांना पैसे दिले जातील. जे सहमती देणार नाहीत त्यांचे सक्तीने भूसंपादन करण्यात येणार, असं जिल्हाधिकारी म्हणाले. या प्रकरणात ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे ते मागे घेतले जातील. तसेच महिला बचत गटांसाठी विमानतळ परिसरात व्यवसायासाठी जागा दिली जाईल असं जिल्हाधिकारी म्हणाले.

## पुण्यात जागेच्या वादातून धक्कादायक घटना; शाहीद इनामदार यांचा हृदयविकाराने मृत्यू

**पुणे । प्र[illegible]**

पुतण्याने केलेली धक्काबुक्की आणि डोळ्यांदेखत केलेला पत्नीचा विनयभंग सहन न झाल्याने हृदयविकाराचा तीव झटका येऊन भवानी पेठेतील गोल्डन ज्युबिली एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष शाहीद इनामदार रविवारी मृत्युमुखी पडले. जागेच्या वादातून घडलेल्या या प्रकाराबद्दल पोलिसांनी आझम कॅम्पसमधील महाराष्ट्र कॉस्मोपिलिटन एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा आबेदा इनामदार आणि त्यांच्या तीन मुलांसह अकरा जणांविरुद्ध विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

आझम कॅम्पससमोरील गोल्डन ज्युबिली एज्युकेशन ट्रस्टच्या आवारात रविवारी सकाळी हा प्रकार घडला. त्याबाबत मयत शाहिद इनामदार यांचा मुलगा मुस्तफा सय्यद बाकरहुसेनी इनामदार (वय ३१, रा. १०२७, नाना पेठ, पुणे ) यांनी खडक पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पोलिसांनी याप्रकरणी आबेदा पीरपाशा अब्दुलरज्जाक इनामदार, परवेज पीरपाशा अब्दुलरज्जाक इनामदार, इफ्तिकार पीरपाशा अब्दुलरज्जाक इनामदार आणि तन्वीर पीरपाशा अब्दुलरज्जाक इनामदार (सर्व. रा. दौलत बिल्डिंग, पदमजी पार्क, नाना पेठ) तसेच आरिफ फकीर मोहम्मद [illegible]ल कादर खान आणि त्यांच्या[illegible]त असलेल्या पाच बाउन्सर्स अशा एकूण अकरा जणांविरुद्ध भारतीय न्यायसंहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात पोलिसांनी सांगितले की, हृदयविकाराच्या झटक्याने मृत झालेले शाहिद इनामदार हे महाराष्ट्र कॉस्मोपॉलिटन एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक पी. ए. इनामदार यांचे धाकटे बंधू व गोल्डन ज्युबिली एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष होते. शनिवारी रात्री आरोपींपैकी काही जण त्यांच्या या ट्रस्टच्या इमारतीत शिरले व तेथील लॅपटॉप, कॉम्प्युटर्स, प्रोजेक्टर असे सुमारे १२ लाख रुपये किमतीचे शैक्षणिक साहित्य गाडीत भरून त्यांनी चोरून नेले. या घटनेची माहिती मिळताच शाहिद इनामदार, त्यांची पत्नी व मुलांसह ट्रस्टच्या इमारतीपाशी गेले व तेथे थांबून राहिलेल्या आरोपींना त्यांनी तेथे थांबण्याबद्दल जाब विचारला. त्यावर ते म्हणाले की, ही जागा परवेज व इफ्तिकार इनामदार यांची आहे. त्यांनीच आम्हाला हे साहित्य येथून काढण्यास सांगितले असल्याचे सांगत त्यांनी शाहिद इनामदार यांच्या छातीवर प्रहार करीत त्यांना खाली ढकलले.

## कात्रजमध्ये थरार! दोन भिंतींच्या अरुंद जागेत अडकला ७ वर्षांचा चिमुकला; जवानांच्या तत्परतेने वाचले प्राण

**पुणे । प्रतिनिधी**

कात्रज परिसरातील जांभुळवाडी येथे आज दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास एक थरारक घटना घडली. खेळत असताना सात वर्षांचा एक लहान मुलगा दोन भिंतींच्या अरुंद जागेमध्ये अडकला. (झींपिश छशुी)



मुलगा अडकल्याची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली.घटनेची वर्दी मिळताच पीएमआरडीए. महापालिका अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. (झींपिश छशुी)

परिस्थिती अत्यंत गंभीर असल्याने बचावकार्य आव्हानात्मक होते. मात्र, जवानांनी प्रसंगावधान राखत घन, बोल्ट कटर आणि हायड्रॉलिक ब्रेकर यांसारख्या अत्याधुनिक उपकरणांचा वापर करून भिंतीचा काही भाग सावधपणे फोडला.

काही वेळ चाललेल्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर अखेर मुलाची सुखरूप सुटका करण्यात जवानांना यश आले. या वेळी उपस्थित नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकत जवानांच्या धाडसाचे आणि तत्परतेचे कौतुक केले. (झींपिश छशुी) सुदैवाने या घटनेत मुलाला कोणतीही गंभीर दुखापत झाली नसून, वैद्यकीय तपासणीसाठी त्याला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, मात्र आपत्ती व्यवस्थापन दलाच्या जलद प्रतिसादामुळे मोठा अनर्थ टळला आहे.

## दौंडमध्ये धक्कादायक घटना; वडिलांकडून ९ वर्षांच्या मुलीची निर्घृण हत्या

**दौंड । प्रतिनिधी**


देऊळगाव राजे (ता. दौंड) येथे एका धक्कादायक घटनेत वडिलांनीच आपल्या ९ वर्षांच्या मुलीची निर्घृण हत्या केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ३ मे २०२६ रोजी पहाटे सुमारे ३.१५ वाजण्याच्या सुमारास हनुमान वस्ती, काळे वस्ती परिसरात ही घटना घडली. आरोपी शांताराम दुर्योधन चव्हाण (वय ३३, व्यवसाय मजुरी) याने त्याची मुलगी अनामिका (वय ९ वर्षे) हिने तिच्या भावाच्या शाळेच्या गुणपत्रिकेवर खाडाखोड केल्याच्या रागातून संतापून तिच्यावर जीवघेणा हल्ला केला.

आरोपीने लाकूड कापण्याच्या मशीनचा वापर करून मुलीच्या गळ्यावर, डोक्यावर आणि शरीरावर वार करत तिची हत्या केल्याचे तक्रारीत नमूद आहे. घटनेनंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह कपड्यात गुंडाळून घराला आग लावून अर्धवट जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. या प्रकरणात आरोपीसोबत असलेल्या चिंगु शिंदबाद भोसले हिने देखील ही घटना कोणालाही सांगू नये असा इशारा देत माहिती लपवून ठेवल्याचा आरोप आहे. या घटनेबाबत निलेश आत्माराम फडणीस (पोलीस शिपाई, दौंड पोलीस ठाणे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी शांताराम चव्हाण व चिंगु भोसले यांच्या विरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १०३(१), २३८, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या

## पाझर तलावात बुडून सख्ख्या जुळ्या बहीण-भावाचा मृत्यू, ओतूरवर शोककळा

**ओतूर । प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात मंगळवारी हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. ओतूर-तळेरान परिसरातील पुष्पावती नदीवरील पाझर तलावात बुडून नऊ वर्षांच्या सख्ख्या जुळ्या बहीण-भावाचा दुर्दैवी मृत्यू झाला. श्रावणी रामदास साबळे आणि गणेश रामदास साबळे (वय ९) अशी मृत चिमुकल्यांची नावे असून, या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यावर शोककळा पसरली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, श्रावणी आणि गणेश हे मूळचे तळेरान (वसईवाडी) येथील रहिवासी होते. शिक्षणासाठी ते आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव येथे राहत होते. सध्या उन्हाळी सुट्ट्यांमुळे ते आपल्या गावी आले होते. मंगळवारी सकाळी सुमारे ११ वाजता गावातील इतर मुलांसोबत ते पुष्पावती नदीवरील पाझर तलावावर कपडे धुण्यासाठी गेले होते. तलावाच्या काठावर खेळत असताना दोघांचाही पाय घसरून ते खोल पाण्यात गेले. पाण्याचा अंदाज न आल्याने ते बुडू लागले. सोबत असलेल्या मुलांनी आरडाओरडा केल्यानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मोठ्या प्रयत्नांनंतर दोघांनाही पाण्यातून बाहेर काढून तातडीने ओतूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी घोषित केले. या घटनेबाबत माहिती देताना सरपंच गोविंद साबळे म्हणाले, दोन्ही भावंडे अत्यंत गुणी होती. सुट्टीसाठी गावी आले असताना काळाने त्यांच्यावर झडप घातली. या घटनेमुळे साबळे कुटुंबावर आभाळ कोसळले असून संपूर्ण गाव शोकाकुल झाले आहे. एकाच वेळी घरातील दोन चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याने वसईवाडी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, उन्हाळ्याच्या दिवसांत मुले नदी, नाले व तलाव परिसरात जात असल्याने पालकांनी विशेष दक्षता घ्यावी, तसेच मुलांना एकटे जलाशयाजवळ पाठवू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. सदर घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस करत आहेत.

## आंबेगाव सुपर २३ उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक जिज्ञासेला चालना; माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांचा गौरवोद्गार

**घोडेगाव । प्रतिनिधी**

शिक्षण म्हणजे फक्त वर्गात शिकवलं जातं तेवढेच नसतं. पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यवहारी ज्ञान, विविध कौशल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजवली पाहिजे. शिक्षणाचा दर्जा वाढवला पाहिजे. आपली मुले जगाच्या स्पर्धेत पाठवायची असतील तर शाळा शाळांतून विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले पाहिजेत. पंचायत समिती आंबेगाव शिक्षण विभागाने आयुकाच्या सहकार्याने राबविलेला आंबेगाव सुपर २३ उपक्रम अत्यंत स्तुत्य असून विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक व जिज्ञासूवृत्तीला वाव देणारा आहे असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी काढले.



घोडेगाव (ता आंबेगाव ) येथील तहसील कार्यालयात आंबेगाव सुपर २३ व इंग्लिश टॅलेंट सर्च मधील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी वळसे पाटील बोलत होते. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित करा आणि ध्येयाचा पाठलाग करा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आंबेगाव सुपर २३ मधील यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक,इंग्लिश टॅलेंट सर्च स्पर्धेतील तालुक्यातील पहिले पाच विद्यार्थी यांचा गौरव प्रशस्तीपत्र व मेडल देऊन करण्यात आला. याप्रसंगी पंचायत समिती आंबेगावचे सभापती कैलासबुवा काळे, उपसभापती ज्योती पारधी, तहसीलदार सचिन वाघ, गटविकास अधिकारी प्रमिला वाळुंज, गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका, संजय गवारी, संजय पवळे, शिवाजी निघोट, निलेश टेमकर,आयुकाचे वैज्ञानिक सहाय्यक निलेश पोखरकर विस्तार अधिकारी शैला निमसे, कल्पना टाकळकर,संचिता अभंग, केंद्रप्रमुख राजू जाधव, निळकंठ कोरडे, मच्छिंद्र काळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आंबेगावच्या गटशिक्षणाधिकारी रूपाली धोका यांनी केले. सूत्रसंचालन सुनील पाटील यांनी तर आभार निलेश पोखरकर यांनी मानले.

## पुणे पोलिसांचं संतापजनक कृत्य, कॉलेजच्या प्राचार्यांचं जगणं असह्य केलं; घटना उघड होताच थेट बडतर्फ

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात एक धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. एका ५५ वर्षीय महाविद्यालयीन प्राचार्यांना गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवत लुबाडण्यात आल्याचा प्रकार उघड झाला आहे. धक्कादायक बाब म्हणजे नागरिकांचं रक्षण करण्याचं वचन घेतलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांनीही हे घृणास्पद कृत्य केल्यानं पुणे पोलीस दलात मोठी खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित प्राचार्यांना एका खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देण्यात आली होती. ही धमकी देऊन त्यांच्याकडे पैशांची मागणी करण्यात आली. अटकेच्या आणि बदनामीच्या भीतीपोटी प्राचार्यांनी टप्प्याटप्प्याने आरोपींना सुमारे ७ लाख रुपये दिले. मात्र, हा प्रकार वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचल्यानंतर या गंभीर गुन्ह्याचा पर्दाफाश झाला. या प्रकरणात प्राथमिक चौकशीअंती खालील तिघांवर ठपका ठेवण्यात आला आहे. ज्यामध्ये अजित बडे (पोलीस उपनिरीक्षक), सोनाली हिंगे (दामिनी मार्शल), सुदाम तायडे (पोलीस कर्मचारी) यांच्या नावाचा समावेश आहे. घटना उघडकीस आल्यानंतर पोलीस विभागात मोठी खळबळ उडाली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत तत्काळ चौकशी सुरू केली. प्राथमिक चौकशीत आरोपांमध्ये तथ्य आढळून आल्यानंतर तिन्ही कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात आली असून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे. या प्रकरणाचा तपास बंडगार्डन पोलीस स्टेशन हद्दीत सुरू असून, संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया देखील सुरू आहे. अधिक तपासात आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या घटनेमुळे पोलीस दलाच्या प्रतिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून अशा प्रकारांवर कठोर कारवाई करण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. नागरिकांमध्येही संतापाची लाट असून, दोषींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी होत आहे

## खाशाबा चित्रपट पुन्हा वादाच्या भोवऱ्यात, स्थगितीबाबत नागराज मंजुळेंसह जिओला नोटिस

**पुणे । प्रतिनिधी**

न्यायालयात दावा सुरू असतानाही खाशाबा चित्रपटाचा ट्रेलर प्रर्दशित केल्याने चित्रपट स्थगितीच्या सुनावणीसाठी दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्यासह निर्मात्या ज्योती देशपांडे, जिओ स्टुडियो, आटपाट प्रोडक्शनला पुणे सत्र न्यायालयाने नोटिस बजावली आहे. डिसेंबर २०२४ पासून दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी घोषित केलेल्या खाशाबा जाधव यांच्या चित्रपटातील कथा वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. मूळ कथा लेखक संजय दुधाणे यांनी कॉफीराईटबाबत पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात दावा सुरू आहे. खाशाबा जाधव यांच्या चरित्र पुस्तकाचे हक्क २००१ पासून संजय दुधाणे यांच्याकडे असून भारत सरकारच्या कॉपीराईट कार्यालयाचे प्रमाणपत्रही त्यांच्याकडे आहे.




या पुस्तकाच्या कॉपीराईटचा खाशाबा चित्रपटाचा दावा सुरू असतानाच १ मे पासून चित्रपटगृहात खाशाबांचा ट्रेलर प्रर्दशित करण्यात येत आहे. याचा दाखला देत चित्रपट प्रदर्शन करण्यास स्थगितीसाठी डॉ. रविंद्र शिंदे व डॉ. सुवर्णा शिंदे यांनी पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात २ मे रोजी अर्ज दाखल केला. न्यायालयाने अर्जाची तातडीने दखल घेत ८ मे रोजी तातडीच्या सुनावणीसाठी नागराज मंजुळे यांच्यासह ज्योती देशपांडे यांना नोटिसा पाठवल्या आहेत. नागराज मंजुळे यांनी संपर्क साधला असता प्रतिसाद दिला नाही. लेखक दुधाणे म्हणाले की, जिओ स्टुडिओ आणि ज्योती देशपांडे यांना आमचा विरोध नाही. मात्र मंजुळे यांनी माझ्यावर केलेल्या ५ कोटींच्या अब्रुनुसान दाव्यातूनच चित्रपट माझ्या पुस्तकावर आधारित असल्याचे सिद्ध होते.

## पुण्यात फेरीवाल्यांचे नवे सर्वेक्षण सुरू; २३ गावांचा स्वतंत्र समावेश

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या २३ गावांमधील फेरीवाल्यांची स्वतंत्र नोंदणी व पाहणी करण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरू केली आहे. त्याचबरोबर जुन्या शहरातील फेरीवाल्यांचेही नव्याने सर्वेक्षण करण्याची गरज व्यक्त होत असून, एकत्रित पाहणी झाल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होईल, असे मत व्यक्त होत आहे.


यासंदर्भात अतिक्रमण विभागप्रमुख सोमनाथ बनकर यांनी सांगितले की, समाविष्ट २३ गावांमधील फेरीवाल्यांची नोंदणी व सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर ही प्रक्रिया प्रत्यक्षात राबवली जाईल. तसेच जुन्या हद्दीतील फेरीवाल्यांच्या पाहणीबाबतही विचार सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

२०१४ मध्ये झालेल्या सर्वेक्षणानंतर शहराचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला आहे. लोकसंख्यावाढीसोबतच उपजीविकेसाठी फेरीवाला व्यवसायाकडे वळणाऱ्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. त्यामुळे नोंदणीकृत आणि प्रत्यक्ष व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांमध्ये मोठी तफावत निर्माण झाली आहे. परिणामी, नियोजन कोलमडून फुटपाथवरील अतिक्रमण आणि वाहतूक कोंडीचे प्रश्न अधिक गंभीर झाले आहेत. फेरीवाला कायद्यांतर्गत हॉकर झोन निश्चित करून फेरीवाल्यांचे पुनर्वसन करणे अपेक्षित आहे. मात्र, शहरात मर्यादित झोन आणि अपुऱ्या सुविधांमुळे ही प्रक्रिया प्रभावीपणे राबवली गेलेली नाही.

## पुणे मार्केट यार्डमध्ये डाळिंब शेड वाटपावरून वाद पेटला

**पुणे । प्रतिनिधी**

कृषी उत्पन्न बाजार समितीत राज्यासह परराज्यांतून शेतमालाची आवक वाढत असून, शेतमालाला हंगामानुसार अतिरिक्त जागेची आवश्यकता निर्माण झाली आहे. काही वर्षांपूर्वी डाळिंबाच्या आवकसाठी उभारण्यात आलेल्या कॉमन शेडमध्ये काही अडतदारांनी मुक्काम ठोकत वैयक्तिक गाळे निर्माण केले.



त्यामुळे, अन्य व्यापाऱ्यांना आपल्याकडील अतिरिक्त माल उतरविण्यासाठी जागा नसल्याने विरोध होऊ लागल्यानंतर प्रशासनाने येथील चार अडत्यांच्या शेडवर अर्धवट कारवाई करून भीती दाखविली. मात्र, आता हेच डाळिंब शेड १४ व्यापाऱ्यांमध्ये वाटून घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून, त्यामध्ये कोट्यवधींची उलाढाल होणार असल्याच्या चर्चाही बाजारात रंगल्या आहेत. डाळिंबाचा व्यापार लक्षात घेऊन बाजार समितीने मार्केट यार्डच्या काही वर्षांपूर्वी गेट नंबर चारलगत जागेत डाळिंब यार्ड उभारले. त्यात चार आडत्यांना डाळिंब व्यापारास जागा दिली. त्यानुसार काही वर्ष सुरळित व्यापार सुरू होता. त्यानंतर, बहुतांश अडत्यांकडे आवक वाढू लागल्यानंतर त्यांनीही अतिरिक्त आवक होत असल्याचे सांगत डाळिंब यार्डात जागा मिळण्यासाठी मागील दोन तीन वर्षांपासून प्रशासनाकडे तगादा लावला होता. दरम्यान, डाळिंब यार्डासाठी निवडलेली ही जागा न्यायालयीन वादात असतानाही तेथे यार्ड उभारण्याचे प्रयत्न झाले. आवकेनुसार जागा वाटपाचे आराखडेही तयार करण्यात आले. मात्र, तीन ते चार वेळा प्रयत्न होऊनही प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊ शकली नाही. पुढे बांबू मार्केट परिसरात पर्यायी जागेवर भाडेकरार करण्याचाही प्रयत्न झाला. मात्र, तत्कालीन पणन संचालकांनी त्यास स्थगिती देत याबाबत काही कार्यवाही न करण्याची आदेश दिले होते. आता संचालक मंडळ आल्यावर पुन्हा या डाळिंब यार्डचा विषय समोर आला असून, त्यामध्येही आर्थिक देवघेव करणाऱ्या तसेच मर्जीतील अडतदारांना जागा देण्याच्या विचार सुरू असल्याची चर्चा आहे.